आजोळ



सनहा पठाण

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

आजोळ

लेखिका : सनहा पठाण

आजोळ

लेखिका : सनहा पठाण

पत्ता- मु पो . पिलीव , काळमवाडी ,

ता : माळशिरस , जिल्हा : सोलापूर. फोन नं- 7774044414
/9325369269

sanaha.pathan@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यापुर्वी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

या नंबरवर नावगाव कळवा. पुस्तके मिळवा.

प्रकाशन : २४ ऑगस्ट २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे पुस्तक छापील स्वरुपात विक्रीसाठी उपलब्ध आहे.

संपर्क- सनहा पठाण- 7774044414

लेखिका परिचय

पठाण सनहा शब्बेकदीर

शिक्षण : ME (ELECTRONICS)

व्यवसाय :Technology Analyst at Infosys

इ मेल : sanaha.pathan@gmail.com

मोबाईल नंबर :7774044414 /9325369269

पत्ता : मु पो . पिलीव , काळमवाडी ,

ता : माळशिरस , जिल्हा : सोलापूर.

आजोळ

लेखिका: सनहा पठाण

आजोबा आज्जी

"माझं हे 'आजोळ' पुस्तक म्हणजे

आजोळच्या आठवणींचा संग्रह असून,

हे पुस्तक माझ्या आजी-आजोबा यांना समर्पित आहे."

प्रिय वाचक मित्रांनो,

प्रथमतः मी पठाण सनहा शब्बेकदिर ई-साहित्य प्रतिष्ठानचे मनःपूर्वक आभार मानते.

माझं पहिलं पुस्तक '**बालपण**' आणि दुसरी कादंबरी '**पास की फेल**' यांना तुम्ही भरभरून प्रेम दिलंत. मला येणारे ई-मेल, कॉल्स आणि मेसेजेस खरोखरच तुमचा अमूल्य प्रतिसाद दर्शवतात. ई-साहित्य प्रतिष्ठान आणि माझे सर्व वाचक मित्र यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

ह्या धावपळीच्या जीवनात लिहिण्यासाठी वेळ काढणे हे खरंच थोडं कठीण असतं. पण तुमच्यासारखे उत्साही वाचक जर प्रतिसाद देत असतील, तर कठीण कामही क्षणात सोपं वाटतं.

जवळपास ५ वर्षांनंतर हे पुस्तक लिहिण्याचा योग आला**. 'पास की फेल'** या पुस्तकाला खूप, अगदी अपेक्षेपेक्षा अधिक प्रेम मिळालं. त्याचा दुसरा भाग कधी येणार याबद्दल अनेकांना उत्सुकता होती. अनेकदा मी लिहिण्याचा प्रयत्न केला. काही भाग रफ स्वरूपात लिहून ठेवला होता.पण कादंबरी लिहिणं म्हणजे खूप सारा वेळ, एकाग्रता आणि प्रत्येक पात्राची वेगळी भूमिका मांडावी लागते.'पास की फेल' चा पुढचा भाग थोड्या वेळात पूर्ण होणं शक्य नव्हतं. त्यासाठी मी वेगळा वेळ नक्कीच काढेन. पण सध्या मला हा ५ वर्षांचा गॅप भरून काढायचा होता.

कुठेतरी माझ्यातली लेखिका हरवली होती. माझ्या वाचकांच्या यादीतून मी पुसली गेले होते. आणि म्हणूनच मला पुन्हा एकदा लिहायचं होतं—कमी वेळात पूर्ण होईल असं काहीतरी, जेणेकरून मला स्वतःलाही आत्मविश्वास मिळावा की अजूनही आपल्यातली लेखिका जागी आहे.

'बालपण' म्हणजे बालपणीच्या आठवणी होत्या, तशाच काही गमतीशीर गोष्टी 'आजोळ' या पुस्तकात मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. मोबाईल नव्हता तेव्हाचं ते जग, खेड्यातील मजा, दिवाळीच्या आणि उन्हाळ्याच्या सुट्टीतील धमाल, दुर्मिळ खेळ, त्या काळातील खास खाण्याचे पदार्थ, आजी-आजोबांचं प्रेम—या सगळ्यातून आलेले आंबट-गोड अनुभव मी या पुस्तकातून मांडले आहेत.

आजी, आजोबा आणि त्यांचं गाव हे प्रत्येक मुलासाठी एक आकर्षण असतं. ते सगळ्यांसाठी इतकं खास का असतं? आजोळात अशी काय वेगळी मजा असते? हे सांगण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न मी या पुस्तकातून केला आहे.

ज्यांनी आपलं आजोळ जवळून अनुभवलंय, त्यांना अजून काही नवीन गोष्टी आठवतील, त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळेल.आणि नकळत ते आपल्या मुलांनाही त्या गोष्टी, ते खेळ, आणि ते संस्कार देण्याचा प्रयत्न करतील—हाच या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे.

प्रस्तावना

'आजोळ' — फक्त एक शब्द ऐकला तरी प्रत्येक जण हरवतो कुठेतरी... मामाच्या गावी जायचं! उत्सुकता काहीतरी वेगळीच असायची. उन्हाळी किंवा हिवाळी सुट्टी आणि मामाचं गाव — सुट्टी एन्जॉय करण्याची इतकी साधी आणि सोपी व्याख्या होती. पण काळ बदलला... आणि हळूहळू या व्याख्याही बदलत गेल्या. हरवत गेलं मामाचं गाव.आता सुट्टी म्हटलं की मुलं आई वडिलांसोबत कुठेतरी फिरायला जातात.मामाचं गाव आजच्यासारखं "खेडं" राहिलं नाही, आणि त्यात भर म्हणून आजच्या आयांचा एक नवीन ट्रेंड:

"गावी ना ऊन खूप असतं!
किती उकडतं बापरे!
माझ्या मुलांना धुळीची allergy आहे!
गावाकडे गेलं की मुलं आजारी पडतात!
विहिरीचं पाणी चालत नाही!
तिकडे गेलं की सतत किरकिर!
प्रॉपर nutrition follow करावं लागतं!"

Meanwhile, याच आयांना बाहेरचं फास्ट फूड चालतं... पण गावाकडचं घरचं जेवण नाही! किती ते नखरे! आणि ह्याच नादात मुलांचं मामाचं गाव हरवलं.जायचं तर आईसोबत, राहायचं तर आईसोबतच... आणि एका दिवसाच्या ट्रिपमध्येही आई मागे-मागे...

"Don't do this!

Don't eat this!

Don't drink this!"

फक्त १०–१५ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही — तेव्हा खरंच "मामाचं गाव" होतं. ते अनुभवलेली आम्ही शेवटची पिढी असू बहुधा. म्हणतात ना, "अनुभवाचे बोल खरे", म्हणूनच Internet आणि YouTube पेक्षा Nani said, Dadi said हे अनुभव केव्हाही श्रेष्ठ!आजच्या मुलांसाठी technology advance झालीये, पण जे खरंच मिळायला हवं होतं ते हरवलंय... गावाकडे एखादं मूल इंग्लिशमध्ये ४ शब्द बोललं की लगेच – "बघा माझं मूल किती smart आहे!" पण खरंतर, हाच मोठा गैरसमज आहे. जेंव्हा त्याचं बालपण नकळत हरवून गेलंय, त्याच्या नकळत त्याला जे शिकायला हवं होतं, ते मिळालंच नाही — तेंव्हा लक्षात येईल की, "त्या अनुभवांचीच खरी गरज होती." आपल्या वेळेस कुठं होतं एवढं advance? तरी नडली का आपली लहानपणाची मजा? सगळं शिकलोच ना आपण — without gadgets, without Google! आपल्या वेळेस मागेमागे फिरणारी आई नव्हती, पण आजी होती... वडील नव्हते तर आजोबा होते. आणि हक्काचे मामा, आत्या, काका — यांनी वेढलेलं आपलं बालपण होतं. आजही गरज आहे प्रत्येक मुलाला, आपल्या मामाच्या गावाची. हीच गोष्ट आहे माझ्या आजोळची, माझ्या मामाच्या गावाची.

या पुस्तकाचा उद्देश एकच —

प्रत्येक आईने अजूनही आपल्या मुलाला आजोळ, मामाचं गाव, गावाकडची माणसं, त्यांचे अनुभव आणि गावाशी जोडलेली आपली नाळ ही तशीच घट्ट ठेवावी, जशी आपल्या आई-वडिलांनी आपली ठेवली होती. "Mamma's Boy" आणि "Daddy's Girl" ह्याच्या पलिकडेही एक सुंदर जग आहे — ते आपल्या लेकरांना अनुभवू द्यावं. प्रत्येक सुट्टीत त्यांना मामाच्या गावात एक मोकळा श्वास घेऊ द्यावा, जो आपण वर्षानुवर्षं अनुभवला आणि आजही अनुभवण्यासाठी धडपडतोय.

अनुक्रमणिका

क्रमांक	पाठाचे नाव	पान क्रमांक
1	गावं आणि परिसर	7
2	हिवाळी सुट्टी	12
3	रात्रीचा सिनेमा	17
4	भुताच्या गोष्टी	20
5	उन्हाळी सुट्टी	25
6	आजोबांचं शेत	34
7	सिगारेट	38
8	मोगली एरंड	42
9	माझा वाढदिवस	45

1. गावं आणि परिसर

आपण शाळेच्या पुस्तकांमध्ये बऱ्याचदा वाचलंय, आजोळचं वर्णन शक्यतो कोकणातील गावं असतं – नारळ-पोफळीच्या बागा, समुद्रकिनारा, फणस, आणि कोकणातला वाडा. पण माझं आजोळ असं खूप निसर्गरम्य ठिकाणी नव्हतं. तरी जे काही होतं, ते आमच्यासाठी अगदी नैसर्गिक आणि खास होतं, कारण त्याआधी आम्ही कोकण पाहिलंच नव्हतं. माझं गाव – **पिलीव**, आणि माझ्या मामाचं गाव – **चांदापुरी**. त्यातील एक वस्ती – **पठाणवस्ती**, हेच माझं मामाचं गाव. म्हटलं तर फक्त ७ किमीचं अंतर, पण तरीही आमचं तिथं येणं-जाणं हे कोणाच्या तरी लग्नाला किंवा सुट्टीलाच व्हायचं. एवढ्या जवळ असूनही आम्हाला तिथं जाण्याचं वेगळंच आकर्षण वाटायचं. आम्ही ह्या सात किमी अंतरावरचं बालपण घालवलं. ह्या पलीकडे आम्ही तीन भावंडं कोठे गेलोय, हे क्वचितच. असं हे आमचं मामाचं गाव – जिथं जायला पक्का रस्ताच नव्हता. पूर्ण रोड डांबरी व्हायचं म्हणून फक्त खडी टाकलेली आणि डांबरीकरण न झाल्यामुळे उखडलेला रस्ता. गाडीवर बसलं की आजीच्या गाव येईपर्यंत फक्त "धडधड" असा आवाज. ७ किमीवर राजदूत गाडीवर बसून जायला सहज एक तास लागायचा आणि मध्ये २–३ वेळा गाडीतून उतरून चालत जावं लागायचं. ST बस क्वचितच एक टाइम असायची; बाकी private जीप दिवसातून एखादी, तीही सीट भरल्यावरच.

छायाचित्रे

(पुस्तकातील सदर छायाचित्रे हि २०२५ सालातील सध्याच्या स्तिथीतील खरोखरी चित्रे आहेत)

पठाणवस्ती गाव ग्रामपंचायत कार्यालय

पठाणवस्ती जिल्हा परिषद शाळा मस्जिद

आमच्या शाळेतील मुलींचं आजोळ लांब असायचं – कोणाचं मोहोळ, कोणाचं सांगली, कोणाचं सातारा... सगळ्यात जवळ आमचंच असल्याचं कधी कधी वाईट वाटायचं. त्यात ते एकदम खेडं – बाजार करायलाही लोकांना पिलीवला यावं लागायचं. एवढं खेडं! लहानपणी मुलांना वाटतं की आपलं आजोळ आपल्यापेक्षा मोठ्या शहरात असावं, पण आमचं तसं नव्हतं. आणि म्हणूनच त्यावेळी त्याची खंत खूप वाटायची. सगळे पठाण राहत असलेली ही पठाणवस्ती – १५–२० घरांची. आणि सगळे पाहुणेच! माझ्या आजीचं माहेर, आईचं माहेर, आणि काकीचं माहेर – सगळंच पठाणवस्ती. त्यामुळे वस्ती म्हणजे सगळी आपलीच माणसं. आजूबाजूला छोटे-मोठे डोंगर आणि त्याच्या बाजूला ही वस्ती. आजूबाजूला अजून बऱ्याच वस्त्या – ढोरकी, बलवडे, दबाशे वस्ती, मगरवस्ती. पठाणवस्ती ही मुख्य चांदापुरी आणि गारवड या दोन गावांच्या मध्ये.

वस्तीच्या बाजूने वाहणारा मोठा ओढा – त्या ओढ्यावर बांधलेला पूल म्हणजे बंधारा. ओढ्याला चिटकून कवटाची लांब उंच झाडं आणि तिथंच आंब्याची झाडं. आणि तिथंच आमच्या वस्तीचं छोटं देवस्थान – मेहबुसुभानी, आणि त्यालाच लागून कब्रस्थान. हा सगळा भाग 'पांधी' म्हणून ओळखला जायचा. इथे ओढा होता, कवटाची झाडं होती, आंब्याची आमराई होती, कब्रस्थान होते, विहीर होती – एवढं सगळं आलं की automatically येतं ते भुतांच्या गोष्टी! रात्री काय पण आम्ही मुलं दिवसापण त्या area मध्ये जायला घाबरायचो. धाब्याची घरं – म्हणजे मातीची, स्लॅब पण मातीचाच. ना थंडी

वाजायची, ना गरम व्हायचं, पण कधी कधी थोडीफार माती पडायची. घरांना जास्त ventilation नसायचं. धान्य साठवण्यासाठी घराबाहेर मोठ्या पात्राच्या कणग्या केलेल्या. कणग्या ह्या जमिनीत गाडलेल्या असायच्या, त्यामुळे हलवणं कठीण – त्या कायमच्याच. आम्हाला कळत होतं तेव्हा त्यात काही ठेवलं जात नव्हतं, तरीही त्या होत्याच. उंचीला प्रत्येक कणगी ही घराच्या उंचीइतकी, गोल आणि वर टोपण. म्हणतात की पहिली लोकं वस्तीबाहेरच्या लोकांसोबत भांडणं करायची, आणि मग ते लोक शोधायला गावात आले की, हे लोक त्या कणग्यांमध्ये लपायचे.

छायाचित्रे



मेहबुसुभानी देवस्थान पत्र्याच्या धान्य साठवणीच्या कणग्या

कब्रस्थान देवस्थान लगतचा ओढा

पांधी चा भाग वस्तीवरची धाब्याची घरे

जास्त load shedding असणारं हे गाव. क्वचितच २–३ जणांच्या घरात TV होता. मोबाईल तर नव्हतेच. Fridge फक्त एका घरी, जिथून आम्ही कुल्फ्या विकत आणून खायचो. पाण्याचीही खास सोय नव्हती. विहिरी होत्या, पण तिथून घरात pipeline फार थोड्यांनी केलेला. उन्हाळ्यात तर खूपच त्रास व्हायचा. वस्तीवर ५–६ hand pumps (हाफसे) वेगवेगळ्या गल्ल्यांत लावलेले होते. हाफसा म्हणजे हातपंप – चालवल्यावर पाणी यायचं. सहसा धुणीभांडी करण्यासाठी हाफसाचाच वापर करायचा. आम्ही पण खूपदा हाफसावर पाणी हाफसून भरायचो. पण उन्हाळ्यात हाफसालाही पाणी नसायचं. Landline phone पण २–३ घरांतच. काय निरोप असेल तर त्या घरी फोन यायचा. २ घरांत किराणा दुकान, वस्तीवर एक जिल्हा परिषद शाळा, स्वतंत्र ग्रामपंचायत, एक मस्जिद. वस्तीपासून १ किमी अंतरावर दुसरी वस्ती – जिथं ५वी ते १०वी हायस्कूल. अर्थातच सगळ्यांचा मुख्य income source – शेती.

आणि दुसरा – transportation. घरात दोन भाऊ असले की एक शेती करायचा, दुसरा ट्रक चालवायचा. प्रत्येक घरात transport truck दिसणं हे अगदीच सामान्य. माझे आजोबा retired headmaster होते. आणि रिटायरमेंटनंतर full-time व्यवसाय म्हणजे फक्त शेती! असं हे शेतकऱ्यांचं गाव – जिथं गावाच्या आजूबाजूलाच सगळ्यांची शेती विखुरलेली. कोणाची canal च्या बाजूला, कोणाची ओढ्यालगत, कोणाची वस्तीला चिटकून.

माझ्या आजोबांची शेती ओढ्याच्या पलीकडे होती. ओढा दोन रस्त्यांना लागायचा – आजोबांच्या शेताजवळून वाहत पुढे कवटाच्या झाडांखाली, स्मशानभूमीच्या दुसऱ्या बाजूने. आजोबांचं शेत वरच्या टोकाला होतं – जिथून गारवड गावाला जायला रस्ता होता. ओढा संपला की केतकयांची झाडं लागत, ती म्हणजे शेताची boundary. शेतात एक जुनं कौलारू घर होतं. द्राक्षांचा हंगाम असला की आजी-आजोबा, मामा – सगळे तिथंच राहायला जायचे. द्राक्षांची बाग, देशी आंब्याची झाडं, आवळ्याची झाडं, घराजवळ पपईची चार-पाच झाडं, बाजरीचा वावर, आणि पाखरांसाठी माळा – असं हे माझ्या आजोबांचं शेत.

हेच माझं आजोळ – जिथं फार काही सुखसोयी नव्हत्या, ना मोठी दुकानं होती, ना entertainment. तरीही शेत, ओढा, जीवाभावाची माणसं आणि त्यांचं निखळ प्रेम – यामुळे आमची प्रत्येक सुट्टी नेहमी आनंदात जायची. प्रत्येक हिवाळी आणि उन्हाळी सुट्टी आम्ही तिथे घालवण्यासाठी आतुर असायचो.

कवीटच झाड

(यापेक्षा मोठी आणि उंच कवीटाचि झाडे वस्तीवर होती)

हापसा

2.हिवाळी सुट्टी

दर सुट्टीची ही वेगळी मजा असायची कारण हिवाळी सुट्टीत वेगळं वातावरण असायचं आणि उन्हाळी सुट्टीत वेगळं. हिवाळी सुट्टीत ओढ्याला फुल पाणी असायचं कारण नुकतंच पावसाळा संपलेला असायचा, त्यामुळे ती वेगळीच मजा. हिवाळी सुट्टी म्हटलं की मेन सण म्हणजे दिवाळी. सगळयांच्या घरी नातवंडं यायचीच. वस्ती अशी गजबजलेली दिसायची. ह्या सुट्टीतले मित्र-मैत्रिणी आलेत का, हे पाहण्यातच आमचा दिवस जायचा. येताना खूप सारे फटाके आणलेले असायचे. मम्मी चार दिवस राहून मागारी जाणार असायची आणि ह्या चार दिवसात चिवडा, चकली, काटेसिव, करंजा उरकून घ्यावं लागायचं. मीही त्यांना मदत करायचे. आम्ही आमचा दिवाळी अभ्यास घेऊन जायचो. रोज थोडं थोडं करून दोन आठवड्यांत तो संपवायचा असायचा.

आम्ही कधी सुट्टीत घरी बसून जेवलोय, हे फारसं आठवत नाही. गरम गरम भाकरी, भाजी आणि लोणचं घ्यायचं आणि पारावर जेवायला जायचं. बाकीचे मित्र-मैत्रिणी पण तिथेच येणार. इडली, डोसा असे पदार्थ फार कोणी करत नव्हतं त्यावेळी. सकाळी उठलो की दात घासून पहिला ताव चहा-चपातीवर. तूप पण जास्त नसायचं त्यावेळी. आज्जी मस्त डालडा घालून चपाती तव्यावर लाल करायची आणि ती कडक घरपूस चपाती आणि चहा हा आमचा नाश्ता. ११ वाजता पारावरच जेवण. सगळयांच्या वेगवेगळया भाज्या, लोणची, पापड, कुरडया आणि बाजरीची भाकरी असा बेत. एरवी १०-१५ मिनिटात उरकणारं जेवण तिथे तासभर चालायचं. भाजलेल्या शेंगा असायच्या

सोबत. जेवण झालं तरी शेंगा संपेपर्यंत गप्पा रंगलेल्या असायच्या. वांग्याची पातळ भाजी किंवा तिखट वरण, ठेचा, बटाट्याची भाजी, कढी आणि भजी असं कॉमन जेवण असायचं आणि तेच आम्हाला खूप छान वाटायचं.

झाडाखालचा कट्टा ज्याला पारावर म्हणत असे

आम्ही येताना दिवाळीच्या सुट्टीत उडवायला खूप सारे फटाके आणायचो. मग रात्री आम्ही मामाला घेऊन ते उडवायचो. फुलबाजे, रंगीबेरंगी झाड, भुईचक्कर हे आम्ही घरी उडवायचो. भुईचक्करला आम्ही पाटीत ठेवून उडवायचो. एकदा ते पाटीतून बाहेर आले आणि मामाच्या पायात घुसले. नशीब त्याचं की त्याला काही इजा झाली नाही. तेव्हापासून आम्ही भुईचक्कर आणलेच नाहीत. बाकी सुतळी बॉम्ब, आयटम बॉम्ब, तुडतुडे हे शाळेच्या पाठीमागे मोकळ्या जागेत उडवायचो. दिवसभर टिकल्या — ज्या छोट्या

छोट्या डब्ब्यात भेटायच्च्या — त्या दगडाने ठेचून उडवायचो. आणि रीळ टाकलेली बंदूक घेऊन वस्तीभर उडवत फिरायचो. मग उडवलेली रीळ काढून न उडालेल्या परत दगडाने ठेचायचो.

दिवाळी

रात्री पोती वाचायला मशिदीत जायचो. तिथे मौलाना आम्हाला आमचं पवित्र ग्रंथ कुराण वाचायचं शिक्षण द्यायचे. नमाज पढायचे धडे द्यायचे. दिवसभर खेळ आणि सायंकाळी धार्मिक शिक्षण — मन एकदम प्रसन्न आणि शांत व्हायचं. आल्यानंतर जेवण, गप्पा गोष्टी आणि झोप.

तेव्हा एका नवीन भविष्य कळणार हा खेळ आम्ही शिकलेलो तो असा कि 1, 0, 2 हे नंबर मिळून जेवढे नंबर तयार होतात ते एका कागदावर वळीने लिहायचे म्हणजे 000, 001 पासून 222 पर्यंत सगळे नंबर ज्याच्यात 0,1 आणि 2 फक्त हेच नंबर यायला पाहिजे. आणि प्रत्येक नंबर च्या पुढे एक वाक्य लिहायचं जस कि 111 म्हणजे मला तू आवडते / आवडतो. तू आवडत नाही. तू पार्टी द्यावं अशी ईच्छा आहे अशी वाक्य. आता एका व्यक्तीला मनात पकडायला लावायचं आणि एका कागदावर मी उभ्या रेषा ओढत जाणार. जिचं भविष्य बघायचं तिने स्टॉप म्हणलं कि थांबायचं. असं तीन सेट करायचे उभ्या रेषांचे मग तीन तीन सेट करुन रेषा कट करायचं आणि जेवढ्या रेषा शिल्लक राहतील तो आकडा लिहून नंबर तयार करायचा .समजा पहिल्या सेट मध्ये 0 रेषा शिल्लक राहिल्या तर 0 दुसऱ्या सेट मध्ये 2 आणि तिसऱ्या मध्ये 1. तर नंबर आला 021 मग मनातल्या व्यक्तीच नावं सांगायला लावायचं आणि 021 ला काय वाक्य आहे ते वाचायचं. वाक्य असेल तुला खूप शिव्या देऊ वाटतेत आणि मनात पकडलेली व्यक्ती आपली नावडती आहे तर मग आम्ही म्हणायचो खरंच आहे हे. असं हे आगळं वेगळं भविष्य पूर्ण वस्तीवर खूप गाजलं होत.



भविष्य खेळ

एक किस्सा खूपच गमतीशीर आहे तो असा की, एवढ्या खेडेगावात नुकताच भेळ, गोळ्या, बिस्कीट, चॉकलेट असा एक गाडा सुरु झालेला.

भेळ गाडा

तो गाडा पाहुण्यातलाच — दूर असलेल्या चांदापुरी गावातला तो इसम आणि माझ्या आज्जीचे दूरचे भाऊ लागायचे. आज्जी दिवसभर रानात जायची.

ओढ्याच्या पलीकडे रान, म्हणून आज्जीने सांगून ठेवलं होतं — "जर तुम्हाला भेळ खायची असेल तर माझं नाव सांगायचं आणि दिवाळीत एवढा मोठा चिवडा करून ठेवलेला आहे, भेळेला पैसे नाही घालवायचे, चिवडा घेऊन जायचं आणि हलवून द्या म्हणायचं." आम्ही भावंडं रोज चिवडा घेऊन जायचो आणि आज्जीचं नाव सांगून, "हलवून द्या" म्हणायचो. तो बेचारा तोंड वाकडं करून कसा तरी कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, तिखट गोड पाणी टाकून हलवून द्यायचा. असे ५-६ दिवस काही किरकिर न करता दिलं. नंतर मात्र टाळाटाळ करू लागला. खूप वेळ थांबवू लागला. तरीही आम्ही चिवडा घेऊन थांबलेलो असायचो आणि हलवून घ्यायचोच. शेवटी एक दिवस त्याचा बांध तुटला आणि तो म्हणाला, "एक दिवस दिलो, दोन दिवस दिलो, नक्की किती दिवस द्यायचं तुम्हाला? तुमच्यामुळे बाकीचे पण चिवडा घेऊन येतात. त्यामुळे माझी भेळ पण खपत नाही. चला पळा!" आम्ही लटकलेली तोंडं घेऊन घरी आलो. घरी आज्जी नव्हती. मग आम्ही भावंडांनी मिळून घरीच भेळ बनवली. डोळ्यातून ओघळ येईपर्यंत कांदा कापला, टोमॅटो कापला. गडबडीत कोथिंबीर विसरली, तिखट जास्त झालं आणि तसंच हुसकून खाल्ली.

मधेच भेळवाल्याला शिव्या, **"त्याचा मुडदा गाडला. दिलं असतं तर काय झालं असतं?"**

बेचाऱ्याने एवढ्या दिवस दिलं त्याचं कौतुक सोडून, आज नाही दिलं म्हणून शिव्या बसत होत्या. सायंकाळी आज्जी-आजोबा रानातून आले आणि आमचं पुराण चालू झालं,

"असला कसला गं भाऊ तुझा? आज्जी एवढा ओरडला आम्हाला, हाकलून लावलं सगळ्यांसमोर."

तेवढ्यात आजोबा आमच्यावर आभाळासारखे कोसळले. आधीच स्वभाव कडक आणि स्वाभिमानी. त्यांना हे फुकट घेणं अजिबात आवडत नाही.

"रोज फुकटात 'द्या' म्हणता? वेडा आहे का तो? पैसे घेऊन जायचं नाहीतर नाही जायचं. कोणी सांगितलं चिवडा घेऊन जायला?"

आम्ही आज्जीचं नाव सांगितलं, आणि उरलेल्या शिव्या बिचाऱ्या आज्जीला खाव्या लागल्या. बायकांचा स्वभाव चं काटकसरीचा. तिचा काय दोष?

त्या दिवशी एवढंच शिकलो — एखाद्याच्या बांध तुटेल एवढा त्रास कधीच कोणाला द्यायचा नाही. एखाद्याने एक दिवस मदत केली म्हणून कायम करायलाच पाहिजे असं नाही.

त्यावेळी आमचे खेळ म्हणजे **काचा-कवड्या**, पाटीवर किंवा फरशीवर कोळश्याने घर आखायचं. कोणीतरी तुटलेल्या बांगड्याच्या चार काचा, कोणी चार चुचुके, चार छोट्या काड्या, चार खडे घेऊन खेळायला बसायचो. त्यावेळी Dice नव्हते. चिंचुकांचे चिपळ्या करायचो. एका चिंचुकाच्या दोन चिपळ्या — एकीकडे White, एकीकडे Black. अशा ६ चिपळ्या घ्यायचो. २ पांढरे पडले की २ घरं, ६ पांढरे की- ६ घरं, सगळे काळे की -१२ घरं पुढं. दिवस मावळला तरी आम्ही त्यातच असायचो. शेवटी आज्जीची आई म्हणजे माझी

पणजी — ती आम्हाला ओरडायची, "**दिवस मावळला तरी काय हे काचा-कवड्या खेळता? घरात कर्कश नांदतो. असं सांजवेळी खेळू नये**!"

तीच आम्ही सगळी मुलं ऐकत असू. एवढी कडक होती आमची पणजी. आज्जीच्या घरासमोरच तिचं घर. जेवढी कडक, तेवढीच मायाळू. कधी आज्जीला शेतातून यायला उशीर झाला की आम्हाला बोलवून जेवायला घालायची. खूप लाड करायची. पणजोबा तिच्या अगदी विरुद्ध — शांत, हसतमुख, सतत हसवणारे, आराम करणारे. पणजी त्यांना सतत ओरडायची. कारण त्यांचं एकही काम व्यवस्थित नसायचं. पणजोबांना ओरडा बसला की आम्हाला खूप हसू यायचं. पणजी गेली की पणजोबा जोरात हसायचे. पणजी कितीही ओरडली तरी ते मनावर घेत नसतं. त्यांना उर्दूही वाचता यायचं. पेपर वाचायची खूप आवड होती. दिवसभर पेपर वाचत बसायचे. त्यातल्या गोष्टी आम्हाला वाचून दाखवायचे. खूप गम्मत करायचे. उर्दू पेपरही असायचे त्यांच्याकडे. त्यांना मी कधीही टेन्शनमध्ये, रागात, मूड ऑफ पाहिलं नाही. सतत हसत आणि हसवत असत. आजकालच्या जगात असं मला कधी दिसतच नाही. पणजोबांसारखं निखळ आणि साधं-सोपं आयुष्य जगणं — आपल्यासारख्या माणसाला आज कठीणच. त्यांच्या आयुष्यात प्रॉब्लेम नव्हते असं नाही, खूप होते — आपल्यापेक्षा कितीतरी पटीने — पण तरीही आयुष्य इतक्या सुंदरतेने जगण्याची कला कदाचित त्यांना अवगत होती.

पंजोबाचं आज्जीच्या घरासमोरील घर काचा कवड्या खेळ

3.रात्रीचा सिनेमा

दिवसभर हुल्लडबाजी करायची आणि संध्याकाळी ७ ला जेवून ८ ला तर सगळी वस्ती घोरत पडायची. त्यावेळी दर शुक्रवारी 'National' वर रात्री ९.30 वाजता हिंदी सिनेमा असायचा आणि त्यासाठी ९.30 पर्यंत जागायचं म्हणजे खूप मोठी गोष्ट वाटायची। Movie तर पाहायचा असायचा, झोप मात्र आवरायची नाही. मग आम्ही वेगवेगळे उपाय करायचो. दुपारीच तयारी सुरू करायचो. चिंचुके खरपूस भाजून ठेवायचो. अर्धे भाजलेले आणि अर्धे पाण्यात भिजत ठेवायचो म्हणजे चावायला सोपे पडतात. चिंचेचा आंबट-गोड गोळा करायचो. चिंच, गूळ, लसूण आणि तिखट घालून खलबत्यात वाटायचो. असा आमचा बेत. त्यात भाजलेल्या शेंगा, मक्याची कणीस असं बराच जुगाड करून ठेवायचो आणि महत्वाचं म्हणजे दुपारची झोप घ्यायचो। दुपारी झोप येत नसेल तरी जबरदस्ती झोपायचो. सिनेमा 9.30 ला चालू व्हायचा, जेवण करुन अजून बराच वेळ शिल्लक राहायचा मग आम्ही चोर पोलीस च्या चिठ्ठ्या खेळायचो. हा खेळ 4 जणांचा असायचा. 4 चिठ्ठ्या करायच्या एक चोर ज्याला 0 मार्क्स, दुसरा शिपाई 300 मार्क्स, मंत्री 500 आणि राजा 1000. चिठ्ठ्या फेकायच्या आणि एका कागदावर लिहून ठेवायचं प्रत्येक वेळी कोणाला किती पॉईंट मिळाले आणि लास्ट ला त्याची बेरीज करायची. ज्याला जास्त पॉईंट येईल तो विनर. गेम मुळे आम्ही जागायचो पण आणि वेळ पटकन निघून जायचा.

आमच्या आज्जी लोकांचं मात्र ठरलेलं — मिसरी लावत बसायचं म्हणजे झोप येत नाही. त्या एका पाटीत माती घेऊन बसायच्या आणि मिसरी घासत picture बघायच्या आणि त्याच पाटीत थुंकायच्या. बाहेर थुंकायला गेलं तर picture चुकेल म्हणून. मधेच ad लागली की पाणी पिऊन यायचं, बाथरूमला जाऊन यायचं. Picture कसा आहे काय आहे, गप्पा मारायच्या हे ठरलेलं।



Ye Raste Hai Pyar Ke, *Hum Hai Rahi Pyar Ke*, *Baazigar*, *Koyla*, *Aur Pyar Ho Gaya*, *Karan Arjun* यांसारखे movies आम्ही जागून पाहिलेलेच।

त्यावेळची एक गोष्ट अशी — नेहमीप्रमाणे आम्ही चिंचुके भाजून घेतले रात्री जागण्यासाठी. मला सवय अशी होती की मी चिंचुका खूप वेळ तोंडात न फोडता फक्त चघळायचे आणि नरम झाला की मग दातात फोडून खायचे. नेहमीप्रमाणे चिंचुका तोंडात आणि मी picture झोपून पाहत होते आणि झोप लागली। सकाळी उठले तर माझ्या टाळ्याला जड काहीतरी चिकटल्यासारखं वाटलं. मी काढायचा प्रयत्न केला तर चिंचुका घट्ट चिकटलेला. मी जोरात ओढून काढला आणि तो फुगून एवढा मोठा झालेला! मी इतकी घाबरून गेले, नशीब की रात्री घश्यात किंवा श्वसननलिकेत अडकला नाही आणि माझ्या टाळ्यालाही इजा झाली नाही. हा किस्सा मात्र मी कोणालाही सांगितला नाही, नाहीतर पोटभर शिव्या मिळाल्या असत्या आणि चिंचुके कायमचे बंद झाले असते।

हे आमचे TV वरचे सिनेमे. अजून सिनेमे बघायचो ते DVD player वर. गावात फक्त एकाच जणाकडे DVD player होता. ते २–२ रुपये तिकीट ठेवायचे आणि DVD वर movie दाखवायचे. त्यात नवीन आलेले सिनेमे असायचे, त्यामुळे तुफान गर्दी. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळे यायचे. एका रूममध्ये अगदी चेंगराचेंगरी करत बसायचो। २–३ सलग दिवस सलग सेम सिनेमे दाखवायचे तेच. आज न बघितलेला उद्या बघायचा. *Raaz* हा

भुताचा सिनेमा त्यावेळी गाजलेला आणि तो आम्ही २ रुपये तिकीट मध्ये DVD वरच पाहिलेला. त्याची गाणी मात्र खूप दिवस गुणगुणत होतो. *Ha Maine Bhi Pyar Kiya Hai*, *Om Jai Jagdish*, *Humraaz* यांसारखे बरेच नवे सिनेमे आम्ही DVD वर पाहिले।

दुसऱ्या दिवशी मित्रांसोबत त्यांची चर्चा. कुठला सिनेमा बघून आलो की पुढचे कित्येक दिवस त्यातलाच hero आणि त्यातलीच heroine आवडायची, दुसरा सिनेमा येईपर्यंत. DVD player वरच्या सिनेमा साठी आम्ही सगळी लहान मुलं खूप आतुरतेने वाट बघायचो।

आजोबा मात्र ओरडायचे — **"काय तसले भुताचे picture बघून येता रात्री अपरात्री?"**

आज्जीला मात्र अप्रूप असायचं. ती विचारायची, **"काय होत त्या सिनेमात?"**

आणि मग आम्ही भावंडं तिला story सांगायचो. तीही तितक्याच कौतुकाने ऐकायची, हसायची। आमचे पणजोबा मात्र आमच्या आधी DVD सिनेमा साठी जाऊन बसायचे आणि पाहायचे. घरी आल्यावर त्यांना पणजीचा ओरडा बसायचा. आम्ही मात्र सकाळी त्यांची चेष्टा करायचो, "काय नाना, कसा होता रात्रीचा सिनेमा?" ते हसायचे आणि त्या सिनेमा मधलं song गुणगुणायचे

,” मैं आगर सामने आ भी जाया करू , लाजमी हे कि तुम मुझसे परदा करो ...ला ला ला ....”

आणि आम्हालाही खुदकन हसू यायचं।

असा हा आमचा रात्रीचा छोट्याश्या TV वर DVD player वर पाहिलेला २ रुपयांचा सिनेमा — आत्ताच्या कुठल्याही थिएटर मध्ये तशी मजा नाही। म्हणतात ना — मजेसाठी पैसे नाही लागत, जिवाभावाची माणसं लागतात. आणि तशी माणसं आमच्याकडे होती।

इवल्याशा entertainment मध्ये त्यावेळी लाखमोलाची मजा होती...

रात्रीचा सिनेमा

4. भुताच्या गोष्टी

लहानपणी प्रत्येकाने भुतांच्या गोष्टी ऐकलेल्या असतात. प्रत्येकाचं बालपण हे कळत-नकळत भुतांच्या गोष्टी ऐकण्यात आणि त्याला घाबरण्यात गेलेलं असतंच. बालपणी आपण इतके निरागस असतो की कोणी काहीही सांगितलं, तरी त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवायचा. इतके भोळे-भाबडे की कोणीही अगदी सहज आपल्याला फसवेल.

पहिली गोष्ट- बाळूची

आम्हीही आजोळच्या अशाच बऱ्याच भुतांच्या गोष्टी ऐकलेल्या आहेत. पहिली गोष्ट ‘बाळू’ची. आम्ही उन्हाळयात रात्री बाहेर झोपायचो. बाहेर हवेत चारपाई टाकायची आणि आज्जीला गोष्टी सांगायला लावायचो. आज्जी गोष्टी सांगता-सांगता थकायची,

मग ती म्हणायची, **"बाळांनो, आता खूप रात्र झालीय. जर बारा वाजले, तर शाळेच्या मागून बाळूच्या घोड्याच्या घुंगरांचा आवाज येतो. तो फिरतो बारा वाजताच."**

मग आम्ही घाबरून विचारायचो, **"आज्जी, कोण बाळू?"**

आज्जी सांगायची, **"जवळच्या वस्तीवर राहायचा. एकदा त्या वस्तीच्या माणसांची आणि आपल्या वस्तीच्या माणसांची खूप भांडणं झाली. मग त्या बाळूला वरच्या ओढ्यात नेऊन आपल्या वस्तीच्या लोकांनी जीवे मारलं. तो कुठेही फिरायला घोडाच वापरात असे. आता तो मेल्यापासून रात्री बारा नंतर घोड्यावर बसून फिरतो, घोड्याच्या घुंगरांचा आवाज शाळेच्या पाठीमागून येतो**."

आज्जीने सांगितल्यापासून आमची घाबरगुंडी उडालेली. आज्जी झोपली तरी आम्हाला झोप लागत नसे. रात्री कानात सारखं वाटायचं, जणू घुंगरांचा आवाज येतोय. मधूनच घाबरून हळूच आज्जीला आवाज द्यायचो, **"आज्जी... ये आज्जी, झोपलीस का?"**

आज्जी एवढी गाढ झोपलेली असायची की काहीच उत्तर द्यायची नाही. पण आजोबा मात्र जोरात ओरडायचे, **"झोपता का नाही आता? झोपा बरं!"** तसं बाळूपेक्षा जास्त आम्ही आजोबांना घाबरून डोळे झाकून बिस्मिल्ला ईररहिमन निर्रहीम असं देवाचं नाव घेत झोपायचो.

दुसऱ्या दिवशी आम्ही मित्रांना सांगायचो, **"तुम्हाला माहितीय का? रात्री बाळू घोड्यावर फिरतो. तो भूत आहे. मला पण रात्री घोड्याचा घुंगरांचा आवाज आला!"**

तेव्हा बाकीचेही म्हणायचे, **"हो, आम्हालाही सांगितलं आमच्या आज्जी-आजोबांनी. आपण शाळेकडे जायलाच नको. बापरे! तुला पण आवाज आला? आता काय करायचं?"**

कित्तीतरी दिवस आम्ही शाळेकडे जायचोच नाही. आजही आज्जीला विचारलं, "**आज्जी, खरंच घरचं भूत होतं का?" तर अजूनही ती म्हणते, "आता माणसंच भुतांसारखी वागायला लागलीत. गेली बेचारी पळून."**

दुसरी गोष्ट – कवटाच्या झाडावरचं भूत

माझ्या काकीचं माहेर पठाणवस्तीचं. तिने आम्हाला तिथली एक भुताची गोष्ट सांगितली होती. ती लहान असताना झाडावर चढायला खूप आवडायचं. पण शाळेत जायला अजिबात आवडायचं नाही. ती शाळा बुडवायची, मग तिची आई काटी घेऊन वस्तीभर तिला शोधायची. आणि काकी, आईला घाबरून स्मशानभूमीजवळच्या कवटाच्या झाडावर जाऊन बसायची.

एकदा आई तिला वस्तीभर शोधत होती आणि ही नेहमीसारखी कवटाच्या झाडावर जाऊन बसली. हिने लांबून पाहिलं की आई झाडाकडे येतेय, तशी ही अजून वर चढायला लागली. वर गेल्यावर बघते तर काय! पांढरे कपडे घालून एक माणूस झाडावर बसलेला. घाबरून हिचे हात सुटले आणि ही झाडावरून दणकन खाली पडली. उठून वस्ती कडे पळाली. परत कधीही ती त्या झाडाजवळ एकटी फिरकलीच नाही. हा किस्सा ऐकल्यापासून आम्ही मुलं तिकडे चुकून गेलोच, तरी झाडावर कोण आहे का बघायचो. तरी कोणी ना कोणी ओरडायचं, **"ये तिकडे कोणतरी आहे!" मग आम्ही मागे वळून न बघता नऊ दो ग्यारह व्हायचो!**

तिसरी गोष्ट – ओढ्याचं भूत

कवटाच्या झाडाच्या पुढेच एक ओढा होता. बरेच लोक म्हणायचे, की रात्री बारा वाजता तिथे एक बाई उभी असते आणि येणाऱ्याजाणाऱ्यांना लिफ्ट मागते. एकदा एक माणूस फटफटीवरून ओढ्याच्या रस्त्याने जात होता. अचानक त्याची गाडी बंद पडली. चालूच होईना. इकडे-तिकडे पाहतो, तर बाजूला एक बाई उभी – पांढरी साडी, हिरवा चुडा, केस मोकळे, कपाळावर लाल कुंकू.

तो म्हणाला, **"काय पाहिजे?"**

ती म्हणाली, **"पलीकडे जायचंय."**

तेवढ्यात गाडी चालू झाली. त्या माणसाने परत तिच्याकडे पाहिलं – तिचे पाय उलटे होते! तो क्षणात गाडीत बसला आणि आणि पटकन फटफटीवर पळून गेला. त्याला त्यानंतर आठवडाभर ताप आला. तो माणूस बरा झाला असेल, पण आम्ही कित्येक दिवस ओढ्याजवळ फिरकलोच नाही. कधी आज्जीसोबत धुणी धुण्यासाठी गेलो, तरी बाजूच्या बायांच्या पायांकडे बघायचो – उलटे पाय तर नाहीत ना?

छायाचित्रे

हाच तो वस्तीलगतचा ओढा

चौथी गोष्ट – परीची

माझी काकी दिसायला खूपच सुंदर – गोरी गोरी, लांब चाफेकळी नाक, सडपातळ बांधा, दाट केस, आणि दोन वेण्या. एकदा ती लहान असताना खेळायला म्हणून तिच्या मामाकडे गेली होती. त्यांचं घर ओढ्याच्या पलीकडे होतं. दिवसभर खेळून संध्याकाळी ती निघाली. ओढा पार करताना तिला अंधार झाला आणि पाय घसरून ती पाण्यात पडली. तिचं म्हणणं – तिला पऱ्या भेटल्या! सुंदर पंख असलेल्या, नटलेल्या, हसऱ्या पऱ्या. त्यांनी तिला त्यांच्या दुनियेत नेलं – ती दुनिया खूप भारी होती तिथे आणखीन सुंदर सुंदर पर्या होत्या तिथे मोठं मोठे पर्वत होते . दुधाच्या नद्या होत्या त्यात पऱ्या अंघोळ करत होत्या . रंगेबिरंगी फुलांची झाडे होती . पक्षांचा किलबिलाट होता . मोठ मोठे झुले होते त्यावर पऱ्यांची लहान लेकरं झुलत होती . आलिशान महाल होते . महालात परिंच्या सेवेला दासी होत्या . त्या पऱ्यांना हवा करत होत्या . त्यांना तयार करत होत्या त्यांचा मेकअप करत होत्या . महालात सगळ्या सुख सुविधा होत्या . पऱ्यांनी काकीला जेवू

घातलं जेवणात श्रीखंड-पुरी, गुलाबजाम, बासुंदी, सगळं दिलं. खूप खेळवलं, खाऊ घातलं, मग हळूच तिला परत ओढ्याजवळ सोडलं. वस्तीवरचे लोक म्हणायचे, पऱ्या असतात. काहींना त्या परत आणून सोडतात, काहींना नाही. मग ते लोक मरतात आणि परीच्या दुनियेत जातात. त्यावेळेपासून आम्ही काकीकडे झोपायलाच जात नसायचो!

शेवटी – सत्य, श्रद्धा आणि भ्रम

अशा आमच्या आगळ्या-वेगळ्या भुतांच्या गोष्टी, ज्या आम्ही खरं मानून आमचं बालपण घालवलं. आजही काही लोक म्हणतात, **"हे सगळं खरं आहे."** पण माझे पप्पा खूप कडक. त्यांना अंधश्रद्धेचा प्रचंड राग. आम्हाला त्यांनी लहानपणापासूनच शिकवलं – **भूतप्रेत काही नसतं**! आणि खरंच – आम्हीही कळायला लागल्यापासून अंधश्रद्धेला आयुष्यात जागाच दिली नाही. पण ते निरागस बालपण... ते मात्र या गोष्टींनी भारलेलं होतं. कदाचित मुलांनी झाडावर, ओढ्याकडे, एकटं जाऊ नये म्हणून केलेल्या गोष्टी कधी भ्रम बनल्या, हे त्या मोठ्यांनाही कळलं नसेल.

माणूस जो विचार करतो, तसं जग त्याला दिसतं. भूतं आहेत असं मानलं, की ती मनात आणि भ्रमात येतात. नाही मानलं, की ती ना मनात येतात ना वास्तवात.

5.उन्हाळी सुट्टी

उन्हाळी सुट्टीची मज्जा ही काही औरच असायची! कारण उन्हाळी सुट्टी चक्क दोन महिने भरपूर असायची – एप्रिल अर्धा, मे पूर्ण, आणि जून अर्धा – एवढा मोठा कालावधी. कधी कधी तर सुटीनंतर वर्गातल्या काही मुलींची नावंसुद्धा विसरलेलो असायचो! उन्हाळा, अवकाळी पावसाळा, आणि खराखुरा पावसाळा – एवढ्या सगळ्या काळात सुट्टी चालायची. ओढ्याचं पाणी आटलेलं असायचं, विहिरींनाही पाणी नसायचं, आणि शेतात जास्त काही काम नसल्यामुळे वेळच वेळ असायचा. रखरखत ऊन, आणि दिवस उशिरा मावळणं – वेळेचा काही तोटा नसायचा.

सुट्टी लागलेला दिवस म्हणजे आम्ही आज्जीच्या घरी जाऊन "टच" झालेलो असायचो! आमचे काही मित्रमैत्रिणी आधीच आलेले असायचे, तर काही येणार असायचे. कैरीचं लोणचं घालण्याची धांदल सुरू असायची. वस्तीवरच्या सगळ्या बायका वाळवणाच्या नादाला लागलेल्या असायच्या. रोज कुणाच्यातरी घरी कुरवड्या, पापड्या, वेफर्स तयार होत असायचे.

आम्हीही आज्जीबरोबर त्या त्या घरी जायचो. त्या निमित्ताने कुरवडीचा स्वादिष्ट चीक खायला मिळायचा!

आज्जीच्या घरी ज्या दिवशी वाळवण करायचं असायचं, त्या दिवशी आम्ही सकाळपासून आज्जीला मदत करायचो. कट्ट्यावर वाळवणं ठेवायचो आणि दिवसभर आज्जी आम्हाला कुत्र्यांना आणि कोंबड्यांना राखण बसवायला सांगायची. तरीही त्या कोंबड्या चोचीत काही ना काही उचलून पळवायच्याच! संध्याकाळी मग ते सगळं परातीत काढून पलंगावर ठेवायचो – म्हणजे राखण लागायची नाही. आंब्याचा सीझन तर भन्नाटच असायचा ! त्यावेळी देशी आंबेच जास्त असायचे – चोखून खायचे! केसर-हापूस वगैरे क्वचितच मिळायचे. आज्जीच्या शेतात दोन देशी आंब्याची झाडं होती. आजोबा आंबे तोडून पिकवून ठेवायचे. हिरवट रंगाचे देशी आंबे चोखूनच खावं लागायचं – नाहीतर सगळा रस सांडायचा ! दिवसातून चार-पाच वेळा आम्ही आंबे खायचो. बाहेर खेळून आल्यावर, लगेच आंबा! घरातले आंबे संपले, की आजोबा कलमी आंबे बाजारातून आणायचे. ते मात्र कापून खायचे असायचे – पण तेही आम्ही भरपूर खायचो! कधी कधी आम्ही सगळी लेकरं ओढ्याजवळच्या आमराईत जायचो. दगड मारून आंबे पाडायचो. कधी कधी ज्यांची झाडं असायची, ती लोकं जवळचं शेतात असायचे. ते दूरून दिसले, की आम्ही वस्तीच्या रस्त्याला लागायचो! एक-दोन जणांना ते ओळखायचे. मग रात्री ते प्रत्येकाच्या घरी सांगायचे – आणि आम्ही मग भरपूर शिव्या खायचो!

उन्हाळी सुट्टी म्हटली की कच्ची कैरी, कैरीचं लोणचं, आंबे, तळलेल्या पापड्या-कुरवड्या – हे रोजच्या जेवणात ठरलेलं असायचं.

आंब्याच्या कोयांचा खेळ

आंब्याच्या कोयांचा खेळ हा आमचा उन्हाळी सुट्टीतला आवडता खेळ होता. आंबे खाल्ल्यावर आम्ही त्या कोया उन्हात वाळवायला टाकायचो. एक जागा ठरवून तिथं सगळ्या कोया गोळा करून ठेवायचो. कोया कमी पडल्या, की आम्ही वस्तीभर फिरून कोया शोधायचो. वकुर्ड्यांवर जास्त कोया सापडायच्या!

दुपारी ऊन कमी झालं की आमचा कोयांचा खेळ सुरु व्हायचा. आम्ही पाच-सहा जण असायचो. प्रत्येक जण दहा-दहा कोया एका मोठ्या गोलात ठेवायचो. सगळ्यांच्या मिळून जवळपास साठ कोया त्या रिंगणात असायच्या.

मग थोड्या अंतरावरून आम्ही **ढपंर** फेकून कोया उडवायचो. जेवढ्या कोया गोलाबाहेर पडायच्या, त्या आपल्याच! **ढपंर** म्हणजे दगडाचा चपटा तुकडा – कधी फरशीचा तुकडा. तो जितका चपटा,

तितक्या जास्त कोया बाहेर! म्हणून धमपारासाठी चपटा दगड शोधण्याची सगळ्यात मोठी धडपड असायची. कधी एखाद्याला भरपूर कोया मिळायच्या, तर कधी कुणाला एकही मिळायची नाही! खेळ संपल्यावर प्रत्येकाने आपापल्या कोया कॅरीबॅगमध्ये भरायच्या, आणि आजीच्या शेळ्यांच्या बागडात नेऊन ठेवायच्या.

कधी कधी असं वाटतं – सगळं सोडून एक दिवस तरी परत असच जगावं – तेच खेळ, तीच मैफिल, आणि तीच मजा.

पैशाने सगळ्या सुखसोयी विकत घेता येतात, पण त्या बालपणीच्या उन्हाळी सुट्टीच्या आठवणी – त्या मात्र अमूल्य असतात...

बालपण विकत घेणं कोणाला जमेल का?

बालपणातला तो आनंद, ती मजा, आणि ते क्षण... हे सगळं विकत घेणं कोणालाही शक्य नाही – हे अशक्यच आहे.

चिंचुक्यांचा खेळ आणि हरवलेलं बालपण

आमचा दुसरा एक आवडता खेळ म्हणजे चिंचुके! प्रत्येकाच्याच घरात एक दिवस "चिंचा फोडायचा कार्यक्रम" ठरलेला असायचा. शेतातून झाडून आणलेल्या चिंचा आज्जी एका मोठ्या टोपलीत घालायची आणि टरफलं काढायची. मग आमचं काम सुरू व्हायचं – त्या चिंचा दगडावर ठेचून त्यातून चिंचुके वेगळे काढायचे.

मग जे चिंचुके काढले जायचे, तो आमचा ‘खजिना’ असायचा ! काही चिंचुके आम्ही भाजून खायचो, तर काही तसेच चघळायला ठेवायचो. आणि उरलेले? त्यांचा खेळ असायचा!

चिंचुक्यांचा खेळ – घरातला खेळ, पण भारीच!

चिंचुक्यांचा खेळ हा आमच्या उन्हाळ्याच्या सुट्टीतला एक खास इनडोअर गेम होता. कोयांचा खेळ हा बाहेर खेळायचा, तर चिंचुक्यांचा खेळ आम्ही घरात, किंवा जास्त करून पारावर खेळायचो. पारावर झाडाची सावली असायची, आणि फरशीसारखा गुळगुळीत कोबा असायचा, त्यामुळे चांगला नेम लागत असे. घरातसुद्धा खेळलो आहोत, पण पारावर खेळलेलं जास्त आठवतं.

समजा दोन खेळाडू असतील, तर एक १०-१० चा डाव घेतला की २० चिंचुके झाले. त्यातला एक खेळाडू ते चिंचुके हातात घेऊन मोकळ्या हाताने खाली टाकायचा – पसरण्यासाठी. मग दुसऱ्याने त्या चिंचुक्यांमधल्या दोन चिंचुक्यांमध्ये करंगळी फिरवायची – अट अशी की, ती करंगळी कोणत्याही चिंचुक्याला टच होऊ नये! आता त्या दोन निवडलेल्या चिंचुक्यांवर कॅरमसारखा नेम घालून मारायचा – आणि जर ते दोन्ही चिंचुके एकमेकांवर आदळून बाहेर पडले, तर ते आपले!

पण अटी कडक होत्या:

- करंगळी टच झाली, तर चुक.

- दोन चिंचुके मारताना ते दुसऱ्या चिंचुक्यांना लागले, तरी चुक.
- चुकीचा नेम गेला, की पुढच्याचा डाव!

कधी कधी इतके वाईट दिवस यायचे की समोरच्याने सगळे चिंचुके जिंकून घ्यायचे, आणि आपण भिकारी व्हायचो! हा चिंचुक्यांचा गमतीशीर खेळ मी माझ्या सात वर्षांच्या मुलाला शिकवला... आणि त्याला तो खूपच आवडला!

आपल्या वेळचे – म्हणजे ९०च्या दशकातले – हे खेळ आजच्या पिढीला आवडायला लागले, की वाटतं, अजूनही खूप गोष्टी त्यांना देता येतील… फक्त त्या आपण जपल्या पाहिजेत आणि त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. जेव्हा आपल्या मुलांनी आपलेच खेळ खेळावेत, आपण जागायचो तसं ते जगावं, आपण ज्या शेतात पळायचो, ज्या गल्ल्यांमध्ये फिरायचो, ते अनुभवावं… तेव्हा खऱ्या अर्थाने वाटतं – आपण आपलं बालपण परत जगतो आहोत.

आणि हा आनंद?

तो शब्दात सांगणं खरंच खूप कठीण आहे… पण तो अमूल्य आहे.

गजग्यांचा खेळ –

अजून एक खेळ आम्ही भरपूर खेळायचो – तो म्हणजे गजगे! आमच्या वस्तीवर, ओढ्यालगत आणि हप्स्याजवळ गजग्यांची झाडं होती. पण आता?

गजग्यांची झाडं तर दिसेनाशी झालीयेत... गायबच झालीत! त्या झाडांवर गजग्यांची फळं लागत. आम्ही वाळलेली गजगे जमवायचो आणि त्यातून खेळ खेळायचो –

अगदी वेगवेगळ्या डावांत:

एकरी: एक गजगं वर फेकायचं आणि खालील एक गजगं झटकन उचलून वरचं झेलायचं.

दुर्री: एक वर फेकायचं, आणि खाली दोन गजगे गोळा करून वरचं झेलायचं.

तिर्री: तसंच पण तीन गजगे गोळा करायचे!

मोठ्या मुली हा खेळ फार छान आणि सफाईने खेळायच्या. त्यांच्या हातात तो खेळ अगदी लयबद्ध आणि नेमक्या गतीनं चालायचा. आम्ही तर त्यांचं बघूनच शिकायचो! पण आता... गजग्यांची झाडं कुठेच दिसत नाहीत... गजगे नाहीत, खेळ नाहीत, आणि आठवणींमध्ये हरवलेली ती गंमतही नाही.

आमचे इतर आवडते खेळ

गजग्यांबरोबरच आम्ही बरेच खेळ खेळलो:

लगोरी

गोट्या

सुरपारंभ्या

लपाछपी

पण विशेष आठवणीतले खेळ म्हणजे – कोया, गजगे, आणि चिंचुके! हे खेळ आम्ही इतके मनापासून खेळायचो की त्यांची मजा अजूनही मनात ताजी आहे. आज गजग्यांची झाडं हरवलीत, पण आठवणी मात्र मनात खोल रुजलेल्या आहेत. जरा डोळे मिटून विचार केला, की वाटतं – त्या पारावर आपण अजूनही खेळतोय...

हरवलेल्या गोष्टी शोधता येत नाहीत, पण आठवणीत त्यांना परत जगता येतं!

उन्हाळी सुट्टी म्हटलं की एक गोष्ट हमखास ठरलेली असायची – ती म्हणजे पोहताना बंधाऱ्यावर जाणं! ओढ्याचं पाणी उन्हाळयात कमी झालेलं असायचं, पण बंधाऱ्यावर पोहोण्यासाठी पुरेसं पाणी असायचं. बुडण्याइतकं

खोल नसल्यानं आम्हा लहान मुलांना तिकडे घाबरायचं काही कारण नसायचं. **बंधारा** म्हणजे – सिमेंटचा पूल. पावसाळ्यात पाणी वाढलं, की त्याच्या वरूनही पाणी वाहायचं. तेव्हा मात्र गावातली जाणती माणसं कोणालाच तिकडे फिरकू द्यायची नाहीत – धोका टाळायला.

पण उन्हाळ्यात? बंधाऱ्याच्या डबक्यांमध्ये उड्या, पोहणे, मस्ती आणि खूप धमाल!

माझ्या मावश्या – मोठ्या मुली – बंधाऱ्यावरून मोठ्या उड्या मारायच्या. आम्ही लहान मुलं त्यांच्याकडे बघून फक्त आचंबित व्हायचो. माझं मात्र असं धाडस नव्हतं – कधी उडी मारलीच नाही. थोडं घाबरटच होते बहुतेक!

कधी कुणाचा पाय दगडावर आपटायचा, कोणाचं हात मुरगळायचा, किंवा नाकाला लागायचं – असले बरेच गमतीजमतीचे किस्से आम्ही ऐकले, पाहिले.

माझ्या एका मावशीने उडी मारताना नाकाचा हाड वाकडं करून घेतलं – आजही ते लक्षात राहिलेलं. पण जेव्हा ओढ्यात पाणी भरलेलं असायचं, तेव्हा मात्र आम्ही गुडघ्याइतकं पाण्यात अगदी मनसोक्त पोहत असायचो.

आज्जी आणि वस्तीवरच्या बायका ओढ्यात धुणी धुवायच्या आणि आम्ही मुले बाजूला पोहत राहायचो – त्या क्षणांची मजा काही वेगळीच होती.

आजच्या स्विमिंग पूलला ही मजा कधीच येणार नाही.

मुलांना जर खरंच पोहायचं नैसर्गिक समाधान द्यायचं असेल, तर त्यांना एक दिवस गावाकडच्या ओढ्यात न्हायला घ्या – ते जे हसतील, खेळतील आणि मस्तीत पोहतील, ते पाहून तुम्हीही भारावून जाल.

जेव्हा ओढा तुडुंब भरलेला असायचा, तेव्हा त्याचं पाण्याचं खळखळणं दूर वस्तीपर्यंत ऐकू यायचं.

रात्री चंद्र-ताऱ्यांच्या साक्षीनं, अंगणात झोपल्यावर त्या खळखळाटाच्या आवाजात झोपणं – त्या शांततेला आणि निसर्गाच्या लोरीला कसलाही तोड नव्हता.

आता तसा आवाज कुठे ऐकायला मिळतोय?

बंधारा, ओढा, पाणी, उड्या, पोहणं, वस्तीवरची गडबड... हे सगळं आता आठवणीत शिल्लक आहे.

पण त्या आठवणी मनाच्या बंधाऱ्यावर साठलेलं पाणी आहेत – शांत, गोड आणि कधीही न सुकणारं.

उन्हाळयात पाण्याची मात्र वस्तीवर खूप तारांबळ असायची, विहिरी ला पाणी नसायचं. जेमतेम 2,3 जणांच्या घरी पाणी यायचं ते पण त्यांच्या विहिरीला असेल तर. उन्हाळयात सर्रास पाण्याचे टँकर यायचे आणि मग 2,3 दिवसाचं पाणी भरून ठेवावं लागायचं. टँकर दुपारी यायचा ते पण फिक्स टाईमिंग नसायचं. आला आला म्हणलं कि वस्तीवरच्या बायका माणसं आणि लहान लेकरं हांडे, बादल्या कळश्या सगळं घेऊन पळायचे. आमची आज्जी सकाळीच

रानात जायची .रान वस्तीपासून लांब होतं मग हि पाणी भरायची जबाबदारी आम्हा तिघा भावंडांवर. टँकर आला आला म्हणता घरातील भांडी घेऊन पळेपर्यंत लांबच लांब लाईन लागलेली असायची. टँकर च्या वरच्या झाकणामधून काही जण स्वतःच्या नळया टाकून पटपट भरून घ्यायचे. आम्ही सगळे लहान, त्यामुळे आम्हाला लाईन ला चं उभं राहायला लागायचं,

"मी आधी येऊन ठेऊन गेलेले बादली तू मध्ये कशी काय आली ",असं म्हणत दोन चार बायका तरी समोरचं भांडत असायच्या भांडता भांडता कधी कधी भांडण हाणामारी वर जायची. आहे त्या पाण्याची पण फेकाफेकी व्हायची त्यात एखादी बाई आम्हाला म्हणाली कि, **"ये बाय हू माग मी कधीची कळशी ठेऊन गेलेय ."**आम्ही अगोदरची भांडण बघून मुकाट्यानं मागे जायचो. आमच्या लहान असण्याचा मोठी लोकं न कळत फायदा घ्यायची. आम्ही कसं बस अर्ध निम्मं पाणी भरायचो आणि टँकर पुढच्या गल्लीत जायचा. गल्ली लांब असली तरी आम्ही जमल तसं भरायचो. आज्जीला जेव्हा कळलं कि बायका आम्ही लहान म्हणून जोरा करतेत ती टँकर आला कि ओढ्यात येऊन हाक द्यायला लावायची हे काम माझ्या धाकट्या भावाचं असायचं कारण असं पण छोटा असल्यामुळे तो पाणी भरण्यात मागेच असायचा मग तो पळत जाऊन ओढ्यातून आज्जीला टँकर आला असा आवाज द्यायचा मग आज्जी येऊन राहिलेलं पाणी भरायची. पाणी भरता भरता आम्ही चं अर्धे निम्मे भिजायचो. आठवड्यातून दोन तीन दा टँकर यायचा आणि आमची तारांबळ उडायची. अक्षरश घरातील मोठं मोठी पातेली सुद्धा आम्ही भरून ठेवायचो

तेव्हा कुठं ते पाणी 3 दिवस पुरायचे. रांजण, डेरा, बाहेरचे प्लास्टिक चे बॅनर, आतल्या बादल्या, टीप, कळश्या, हांडे, घडा आणि सगळी पातील एवढं भरून ठेवावं लागायचं. कधी टँकर नाहीच आला तर हप्स्यावरून हापसून पाणी आणायचो.

टँकर चं पाणी पिण्या योग्य नसायचं मग पिण्याच्या पाण्यासाठी आम्ही आज्जीसोबत विहिरी वर जायचो. वस्तीवरच्च्या बऱ्याच बायका एका जाणत्या माणसाला घेऊन विहिरीला जायच्या. बायकांना पोहता यायचं नाही मग वस्तीवरच जाणत माणूस विहिरीतून कळश्या भरून वर आणून द्यायचे आणि मग बायका आणि आमच्यासारखी लहान लेकरं ती घेऊन घरी यायचो. कधी कधी आज्जी ओरडायची," **कशाला येता तुम्ही विहिरीकडे,मी आणते"** तरीही आम्ही तिच्या मागे लागून जायचो. नळ चालू केला कि पाणी येणार ह्या आजच्या संकल्पनेच्या किती दूर होतो आम्ही आणि ते अनुभवायला मिळालं हे नशीबच. माणसाला सगळा कॉफोर्ट आहे आज पण त्या without comfort

मध्ये जगलेले दिवस म्हणजे खरे दिवस. अडजस्टमेन्ट काय असती आणि एवढ्याश्या पाण्यासाठी पण खेड्यातील लोकांना आजही किती संघर्ष आहे आणि त्या पाण्याची खरी किंमत आम्हाला तेव्हा कळली. तीच किंमत आजकालच्या मुलांना कळायला पाहिजे, कळण्यापेक्षा त्यांनी अनुभवलं पाहिजे, जगलं पाहिजे. Save वॉटर प्रोजेक्ट करून आना म्हणलं कि मुलांच्या आया रात्रीचा स्वयंपाक पण करत नाहीत, बाहेरून parcel मागवायचं आणि प्रोजेक्ट करायला चालू ,"save वॉटर". मुलांनी काय बोध घ्यायचा? इकडे आई बाबा save वॉटर project करतायत तिकडे मुले मस्त shower सोडून खेळायला लागतात. असा आमचा आजच्या पिढीतील "save water". सांगायचं तात्पर्य एकच अनुभवाचे बोल हे आयुष्यभर लक्षात राहतात. मुलं गावाकडं आली कि आपोआप अनुभव येतील आपोआप शिकतील घडतील. Summer vacation camp ला पाठवण्यापेक्षा गावी आजोळ ला पाठवा पुस्तकी न्यान सोडून अनुभवाचे बोल शिकेल.

अजून एक उन्हाळ्या सुट्टीतील आमची आवडती गोष्ट म्हणजे कुल्फी. अक्ख्या वस्तीवर फक्त एक जणांच्या इथे fridge होता. ते कुल्फी च्या साच्यात कुल्फी बनवायचे आणि आम्ही ते 2,2 रुपये ला विकत आणायचो. अक्ख्या वस्तीवरची मुलं तिथूनच कुल्फी आणायचे. पुढच्या दारातून आम्ही कधी कुल्फी मागायला जायचो नाही सगळे पाठीमागच्या खिडकीतून आवाज द्यायचे. खिडकीतून आम्हाला त्यांचा फ्रिज स्पष्ट दिसायचा. फ्रिज चा गुंगssss असा आवाज यायचा मग ते साचा काढायचे ते पाण्यात घालून फिरवायचे

आणि आम्हाला कुल्फी द्यायचे. दुपार पर्यंत सगळया कुल्फ्या संपलेल्या असायच्या. आम्ही गेलो कि मग ते म्हणायचे, "**आत्ताच टाकून ठेवलंय एक तास भरानी या** ".आम्ही वेळ लावूनच अजून एक तासाला 10,15 मिनिट कमी तोपर्यंत अजून जायचो आणि विचारायचो, "**झालं का बघता का वो**?"

अक्षरश आम्हाला ते वैतागायचे. कधी कधी ओरडून सांगायचे, **" light धिम आहे आता उद्या या "**

तेव्हा तर आमचा पूर्ण मूड चं जायचा.

कधी कधी वस्तीवर दिवसभर light नसायची मग दिवसभर कुल्फी खायला मिळायची नाही. आम्ही उगीच कुल्फीवाल्याच्या खिडकीत जाऊन फ्रिज चा आवाज येतोय का ऐकायचो आला तर light आलीय नाही तर नाही. खिडकीत उभा राहिलेलं कधी आतून त्यांनी पाहिलं कि ओरडायचे, **" काय पाहिजे रे "**

मग आम्ही दबक्या आवाजात म्हणायचो, **" कुल्फी झालीं का वो "**

मग परत त्यांचा ओरडा खायचो, **"सकाळ पासून light आहे का ? कशी कुल्फी होणार ? "**

आम्ही लटकलेली चेहरे घेऊन घरी यायचो.

एकदा तर आम्ही सगळया वस्तीवरच्या मुलांनी icecream करायचं ठरवलं. आमच्यातल्या एकाला आइसक्रीम कसं बनवायचं ते येत होतं.बादलीत बर्फ घालून आणि त्यात एका पातेल्यात icecream ला लागणारे पदार्थ घालून बाहेरच्या बादलीतील बर्फ हलवायचा आणि मग जवळ जवळ 2,3 तास ते पातेलं बर्फात घालून बऱ्याच वेळ ठेवल्यानंतर ते घट्ट व्हायचं आणि ते आईस्क्रीम व्हायचं. त्यावेळी डेअरीला दूध घेऊन जायला दुधाची गाडी यायची त्यात भरपूर बर्फाच्या लाद्या असायच्या त्यातून थोडा बर्फ घ्यायचं हे ठरलेलं. आम्ही सगळी वस्तीवरची मुलं आईस्क्रीम खायला आणि बघायला जो बनवणार त्याच्या घरी जमलो. त्यांचा सोफा म्हणजे हॉल आम्हा मुलांनी भरून गेलेला. एका पातेल्यात दूध त्यात आईस्क्रीम पावडर विलायची आणि साखर टाकून विरघळून घेतलेलं. आता बादलीत लादीतला बर्फ फोडून टाकलेला. पातेलं बादलीत वर धरलेलं ,फक्त त्यांचं बाहेरचं बादलीतल्या बर्फात बुडायला पाहिजे आणि बर्फ काठीने हलवायचं हे जवळ जवळ 2,2.5 तास चालू. आळीपाळीने आम्ही पातेलं पकडायचो आणि बर्फ हलवायचो. बर्फाचं पाणी झालं कि लादी मधील दुसरे बर्फाचे तुकडे फोडून घ्यायचो. जस जस पातेल्यातील मिश्रण घट्ट व्हायला चालू झालं कि आम्हा मुलांचा आनंद गगनात मावायचा नाही.

"ये मला बघू, मला बघू", करत आम्ही सगळे बादलीवर बघण्यासाठी तुटुन पडायचो. शेवटी जास्त घट्ट नाही पण मध्यम घट्ट पणा आला आणि छोट्या पासून मोठ्या पर्यंत आईस्क्रीम कसं लागतं हे आम्ही पहिल्यांदा अनुभवलं. सगळ्या वस्तीवर चर्चा अमक्याच्या नातवाने आईस्क्रीम बनवलं. मग जो तो त्याला विचारणार, **" कसं बरं बनवलं तू?, लग्गा भारी हाय कि तू. "**

पुढचे कित्तेक दिवस आमची तीच चर्चा, **"कसलं भारी आईस्क्रीम होतं "**

पण परत बनवायची हिम्मत मात्र कोणाची झालीं नाही, आता 3 तास तटस्थ गेलेले परत करायला कोण धजावणार आम्ही आपलं कुल्फीवरच आनंद म्हणायचो.

अशी हि आमची धम्माल उन्हाळी सुट्टी आज्जीच्या गावी अगदी गोकुळात नांदल्यासारखी जायची. वायरच्या पिशवीत कपडे घेऊन आलेलो आम्ही वायरची पिशवी घेऊनचं परतायचो. जाताना मात्र एका पिशवीची जागा चार पिशव्यांनी घेतलेली असायची ते माझ्या **आज्जीचं प्रेम.**

आज्जी आजोबांचं वस्तीवरच कौलारू घर आज्जी आजोबांचं सध्याचं राहत घर (आज्जी आजोबा काही दिवस धाब्याच्या व काही दिवस कौलांच्या घरात राहिले)

6. आजोबांचं शेत

माझ्या आजोबांचं शेतीवर नितांत प्रेम , रिटायर झाल्यापासून त्यांनी स्वतःला शेतीत झोकून दिलं होतं . ओढ्याच्या पलीकडे गारवाड रोड ला असलेली शेती तिथे आम्ही लहानपणी जायचो कारण आजोबांची शेती हि एका ठिकाणी सगळी नव्हती, ती वस्तीच्या आजूबाजूला असणाऱ्या परिसरात विखुरलेली होती पण ओढ्याच्या पलीकडे असणाऱ्या शेतात एक कौलारू घर होतं एकाच खोलीचं आणि त्या शेतात द्राक्षेची बाग होती आणि बेदाण्याचा शेड हि घराला चिटकूनच. त्यामुळे आज्जी आजोबा मामा सगळे ह्याच शेतात जास्त जायचे त्यामुळे हेच शेत लहानपणी आम्हाला माहित होत.

आम्ही लहान असताना सर्रास सगळ्यांच्या शेतात द्राक्षेची बाग होती माझ्या वडिलांच्याकडे हि आणि सर्रास सगळे बेदाणे बनवायचे आणि सांगली जवळील तासगाव या ठिकाणी विकायला पाठवायचे. अगदी मी 10 वीत जाईपर्यंत द्राक्षेची बाग होती. नंतर नंतर अवकाळी पाऊसामुळे होणार नुकसान. अमाफ भांडवल आणि बेदाण्यांना दर नाही म्हणून सगळ्यांनी द्राक्षाच्या बागा काढल्या आणि ऊस लावला. पण बालपण मात्र ह्या द्राक्षांच्या बागेतच गेलं आमचं. द्राक्षांना राखण बसण्यापासून बेदाणे वेचून पेटित भरेपर्यंत आम्ही करायचो.

छायाचित्रे

आजोबांचं आत्ताच शेत

आजोबांच्या शेतजवळचा ओढा शेतातील कौलारू घर

आजोबांच्या शेतातील आंब्याचं झाड द्राक्षेची बाग

आज्जीच्या शेतात शेळया म्हैस गाय गायीचा गोठा आणि दारासमोर मोठं बाभळीचे झाड होते. बाभळीचे असून ते डेरेदार होते आणि आम्ही तिथेच जास्त खेळायचो. सकाळी आज्जीचा स्वयंपाक झाला कि आम्ही तिच्याबरोबर शेतात निघायचो. दुपारची जेवण ती बांधून घ्यायची. एका मोठ्या भगुल्यात ती आमची दुपारची भाकरी बांधून घ्यायची आणि ते भगूल चुम्बबड करून डोक्यावर घ्यायची. शेळया वस्तीवरून रोज रानात घेऊन जायला लागायच्या आणि येताना संध्याकाळी परत वापस आणायच्या. ती शेळया बागड्यातून बाहेर काढून द्यायची मग त्यांना हाकलून शेतापर्यंत न्यायचं काम आमचं. शेत ते वस्ती जवळ जवळ दोन किमी अंतर असावं. आमच्यासोबत आम्ही वस्तीवरच्या एक दोन जवळच्या मैत्रिणी मित्र घ्यायचो. त्यांना पण भाकरी बांधून घ्या म्हणायचो आणि आज्जीच्या भगुल्यात टाकायचो. आज्जीचं भगूल म्हणजे खायचा खजिनाचं. शेळया हाकलून नेत असताना मधेच ओढा लागायचा शेळया तिथे थांबायच्या, पाणी प्यायच्या मनसोक्त डुंबायच्या. ओढ्याच्या बाजूलाच शेत. केतकीची झाडे आली कि शेत आलं म्हणायचं. आम्ही अगोदर पोहोचायचो शेतात. आज्जी निवांत यायची मागून तिला मधेच रस्त्यात कोण तरी भेटायचं मग तिच्या गप्पा रंगायच्या. आज्जी येईपर्यंत आजोबा शेळया आजूबाजूच्या झाडांना बांधून त्यांना खायला गवत टाकायचे. आम्ही बाभळीच्या झाडाखाली बसून खेळायला चालू करायचो.

छायाचित्रे

वस्तीवरचा शेळ्यांचा वाडगा शेताजवळच्या ओढा

शेताजवळची केतकीचे झाडे शेतजवळचा ओढ्यातला रास्ता

भातुकलीचा खेळ आमचा बाभळीच्या झाडाखालचा फेव्हरेट. मामा आम्हाला मातीची खेळणी बनवायला शिकवायचा. आम्ही शेतातील वारुळाची चिकट माती यूरिया च्या ठीक्यात घालून आणायचो मग त्याला पत्र्यांच्या चाळणीने चाळायचो. थोडं थोडं पाणी टाकून चिखलाचा गोळा बनवायचो. मामाने आम्हाला छान चिखल बनवण्यासाठी एक ट्रिक दिली होती. एक फरशी घ्यायची आणि थोडा थोडा चिखलाचा गोळा फर्शीवर आपटून चांगला चिकट आणि मऊ करायचा जेणेकरून चिखलाच्या भांड्याला चीर पडणार नाही. मामाने आम्हाला चिखलाची चूल, गॅस, पोळपाट, खलबत्ता, तवा, पातेलं, परात, हंडा, कळश्या, तांब्या, ग्लास अगदी tv, फ्रिज, पलंग आणि कपाट सुद्धा बनवून दिला होता. त्यानंतर सगळी भांडी आम्ही उन्हात कडक वाळवायला ठेवायचो. कधी दुपार व्हायची हे सुद्धा आम्हाला लवकर समजत नसे. आज्जी जेवायला सुटायची मग आम्हाला आवाज द्यायची. आम्ही चिखलात माखलेले हात पाय धुऊन जेवायला बसायचो. आज्जी आजोबा, मामा, शेतातील एक दोन बायका, मी, माझे दोन भाऊ माझ्या मैत्रिणी, भावाचा एखादा दुसरा मित्र अशी आमची मैफिल. बाजरीची भाकरी पात्तळ भाजी, शेंगदाण्याची किव्वा मसाला चटणी, लोणचं आणि आज्जीनी शेतातून आणलेली पत्र्याची कोवळी भाजी तोंडी लावायला. कधी 1,2 भाकऱ्या आम्ही फस्त करायचो कळायचं हि नाही.

आज्जीच्या शेतातील बायका जेवता जेवता विचारायच्या, **" सज्जू ची पोरगी का ? अन हा सज्जू चा पोरगा का ?"**

मग आज्जी त्यांना आमची ओळख करून द्यायची.

मग पुढे त्यांच्या गप्पा रंगायच्या, **"बरं हाय का सज्जू चं ?"**

आम्ही हात धुऊन आमची वाळलेली भांडी काढून खेळण्यात दंग व्हायचो. आम्ही फरश्यांची तुकडे घेऊन त्यावर भातुकली मांडायचो. छोटंसं घर बनवायचो. मुलं दुकानं टाकायची, आजोबांचा जुना छोटा तराजू होता तो तराजू घेऊन ती दुकानं टाकायची. आजूबाजूला असणारी तरवडाची फुल, पाने,

आंब्याच्या झाडाची पाने, लिंबा च्या झाडाची लीम्बुल्या, असं बरंच काही वेचून ते आपल्या दुकानात ठेवायचे. पेपरच्या कागदाच्या नोटा बनवून आम्ही त्यांच्या दुकानात सामान घ्यायला जायचो.साखर द्या म्हणलं कि घडबडीत माती मोजून ते आम्हाला द्यायचे. शेंगदाणे म्हणजे लीम्बुल्या. असं जे जे असेल ते आम्ही घेऊन यायचो आणि त्यांना आमच्या नकली नोटा द्यायचो. आम्ही उगीच खलबत्यात काहीतरी कुटायचो. मातीच्या भाकऱ्या बनवायचो. पान फुल घेऊन त्यांना कुटून भाजी बनवायचो आणि मग दुकानवाल्यांना चं जेवायला बोलवायचो आणि ते बनवलेलं त्यांना खायला द्यायचो ते पण उगं उगीच खायचे आणि छान झालंय म्हणायचे. सगळं visualization पण आनंद अपार. असा हा आमचा दुकानाचा आणि भातुकलीचा खेळ संध्याकाळ पर्यंत रंगायचा. दुपारी कधी कधी शेतात ग्यारेगार वाला यायचा मग आम्ही त्याला थांबवायचो आणि आज्जीला शेतातून हाक मारून बोलवायचो. कधी कधी आज्जीकडे पैसे पण नसायचे तरीही **,"उद्या द्या"** म्हणत घ्यारेगार वाला आम्हाला ग्यारेगार देऊन जायचा. दही ताक असेल तर कधी कधी आम्ही त्यात टाकून खायचो . हिरव्या कलर चं ग्यारेगार माझं फेव्हरेट होतं त्याची चव खूप छान लागायची, लाल हिरवा आणि केशरी पिवळा हे ठरलेले कलर असायचे 5 वाजायच्या सुमारास आम्ही आज्जी शेतात काय करती बघायला जायचो. मग आंब्याच्या झाडाकडे जायचो. पाण्याचा चेंबूर चालू असेल तर त्यात भिजायचो. आज्जीला मदत करतो असं म्हणून बागेत जाऊन बागेत माती खेळत बसायचो. तिथे

काठीने थोडी जागा करायचो मग काठीने ते नांगरायचो त्याचे वाफे बनवून छोटी छोटी झाडे लावायचो पाणी घालायचो आणि शेती शेती खेळायचो.

संध्याकाळ झालीं कि सगळं सामान जागच्या जागी ठेवायचो. मातीची भांडी भिजणार नाहीत अशा ठिकाणी ठेवायचो. भाकरी आणलेले डबे ताटल्या आज्जीच्या भगुल्यात ठेवायचो आणि जाताना हि ठरलेलं काम , आज्जीच्या शेळ्या हाकलवत वस्तीपर्यंत न्यायच्या. जाईपर्यंत मगरीब ची “अजहान” येतं असायची. आज्जी येऊन शेळ्या बांधायची आणि स्वयंपाकाला लागायची. गरम गरम भाकरी भाजी खाऊन बाहेर चारपाई वर गप्पा मारत आमचा डोळा कधी लागायचा कळायचं सुद्धा नाही.

असा हा आज्जीच्या शेतातील अप्रतिम दिवस ना कधी मागारी येऊ शकतो ना आम्ही लहान होऊन पुन्हा तो जगू शकतो. फक्त आठवू शकतो त्या गोड आठवणी. आमच्या मुलांना भातुकलीची भांडी करुन देताना आपल्याला मामाने काय काय करुन दिलेले कसं कसं दिलेलं ते अनुभव त्यांना सांगू शकतो.

7.सिगारेट

आजोळची सुट्टीतली अजून एक अविस्मरणीय किस्सा म्हणजे सिगारेट. वस्तीवर आम्ही एका वयाचे 4,5 जणी होतो. माझ्या चुलत बहिणीची मावस बहीण हि माझी खास friend होती. तिला मुलांसारखं राहायला आणि त्यांच्यासारखं न घाबरता सगळी काम करायला खूप आवडायचं. ती 7 वीत असतानाच राजदूत गाडी splender गाडी चालवायची. गाडीवर आईला घरातील इतर आया बहिणींना कुठे सोडायचं असेल तर सोडायची. मुलांसारखं मोठं मोठ्या उड्या विहिरीत घ्यायची आणि मुलांना मागे टाकेल एवढं फास्ट पोहायची. कधी कधी मुलांसोबत आम्ही पण क्रिकेट खेळायचो तर हि मुलांच्या बरोबरीने बॅटिंग करायची. मोठं मोठे सिक्स आणि फोर मारायची आणि लवकर आऊट पण नाही व्हायची अशी हि आमची दबंग गर्ल होती. आम्ही पण तिच्यासारखा bold व्हायचा प्रयत्न करायचो पण आम्हाला नाही जमायचं. वस्तीवर तीच खूप कौतुक व्हायचं, "**पोरांसारखी फटफटी चालवती, काय पोहती ती, पोरांना माग टाकती अशे सुरुंग लावती विहिरीत. क्रिकेट मध्ये पण तशीच एक नंबर.** "



तिच्या डोक्यात नेहमी काही तरी वेगळं try करायचं असायचं बोल्ड मुलांसारखं. कधी ती आम्हाला ओढ्यातून जांभळं खायला घेऊन जायची कधी डोंगर पाहायला आम्हाला पण ती असली कि भीती वाटायची नाही दबंग गर्ल सारखं आम्ही डोळे झाकून तिच्या मागे.

एक दिवस असंच गप्पा मारता मारता ती आम्हाला वेगवेगळ्या हिरोची acting करुन दाखवायला लागली. सलमान खान, शाहरुख खान ,"क क किरण". मग ती सिगारेट ओढून धूर काढायची acting करुन दाखवायला लागली. मग तिच्या डोक्यात अजून एक आयडिया आली. छपरा नां जी पानसरे वापरतात त्याची काडी सिगारेट सारखी चं असते आपण ती काडी घेऊन पेटवूयात आणि खरोखर acting करुयात. आम्हाला पण खूप उत्सुकता होती मग तिने पहिलं पेटवून acting चालू केली आम्ही पण कुडाच्या काड्या पेटवून उगीच acting करायलो. पण त्यातून धूर काही निघत नव्हता," **अरे याचा धूर**

चं होईना “.म्हणून आम्ही घरी गेलो मी आणि दबंग गर्ल माझ्या आज्जीच्या इथे आलो आज्जी शेतातून यायला अजून time होता. घरी कोणचं नव्हतं.

आजोबांचं वस्तीवरच धाब्याच घर

समोर पंजोबाचं घर होतं तिने मला हळूच सांगितलं, **"तुझ्या पंजोबाकडे विडी असते, ओढतात ते पणजी इकडे तिकडे गेल्यावर. "**

मी आश्चर्याने म्हणलं, **"खरंच !"**

ती म्हणाली, " **हो, बऱ्याचदा त्यांनी आम्हाला सिगारेट ची जादू दाखवलीय "**

मी पुढे म्हणलं, **"कसली जादू "**

ती पुढे म्हणाली, " **ते तोंडातून सिगारेट ओढतात आणि कानातून धूर काढतात. "**

मला हे तर खूप आश्चर्य वाटलं ,**"कसं करत असतील बरं, "**

मी पुढे तिला नकळत म्हणलं, **"तुला येतं का ?"**

ती मुलांसारखं सगळं करायची म्हणून नकळत मी बोलून गेले.

ती म्हणाली ,**“कधी केलं नाही पण आज try करुन बघू आपल्याला जमतंय का “**

मी घाबरट ससा. मी म्हणाले, " **ये नको बाई, तुला ओरडतील सगळे आणि आपल्याकडे कुठे सिगारेट आहे** "

तशी ती हसत म्हणाली, " **आपल्याकडे सिगारेट नाही पण पणजोबा कडे आहे ना, चल आणूया** "

"**ते नाहीत देणार, ओरडतील** ",मी तिला थांबवत म्हंटल

"**चल तू ते एकदा झोपले कि घोडे विकून झोपतात** ",तिने मला हाताला धरून नेलं

सिगरेट चं पाकीट वर खिडकीत चं होतं त्यातून हळूच एक सिगारेट घेऊन आम्ही आज्जीच्या घरात पळालो. दरवाज्याला आतून कडी लावली आणि थेट स्वयंपाक घरात पळालो. पूर्वी स्वयंपाकघरात बाजूला अंघोळीची मोरी असायची त्या मोरीत जाऊन बसलो. हळूच काडेपेटी घेऊन सिगारेट पेटवली. दबंग गर्ल सिनेमा च्या हिरोसारखी acting करू लागली तिला आता real फील येतं होता.

मी तिला हळूच म्हणलं. " **जादू दाखव कि, action काय करायलीय.** "

ती तोंडातून धूर आत घ्यायची नाकातून काढायची. एका नाकातून पण तिला यायला लागलं पण कानातून काय तिला येईना.

तिने बरंच try केलं तिला कानातून धूर काढायला काही जमेना.

माझ्यातला उत्सुकता जागी झालीं मी तिला म्हणलं, " **मी बघते थोडं ओढून कसं लागतंय आन इकडे** "

मी पण ती जस करत होती तस करायला चालू केलं , खूप विचित्र असा घाण वास येतं होता पण कानातून धूर काढायला जमतंय का हे बघायचं होतं. मला तर साधा नाकातून पण काढता येईना. शेवटी धूर इतका झाला कि मला प्रचंड जोरात ठसका लागला आणि मी पळतच कढी उघडून बाहेर पळाले बाहेर बघते तर काय रस्त्या वरून मामा येताना दिसला. पळत आत जाऊन मी ओरडले. " **मामा यायलाय मामा** "

तस दबंग गर्ल नि सिगारेट बादलीत बुडवली आणि हातात लपवली मी पूर्ण बादली मोरीत पलटी केली आणि पाणी टाकून दिलं. स्वयंपाक घरातला मागचा दरवाजा उघडला आणि पळत दोघी बाहेर गेलो.

मामा म्हणाला, " **काय करताय पोरींनो? "**

आम्ही दबक्या आवाजात, " **कुठे काय "**

"खेळायला नाही गेला, घरी काय करताय? ", पुढे मामा म्हणाला

" पाणी ",दबंग गर्ल म्हणाली

मी पुढे सावरत. म्हणलं, "**हिला तहान लागलेली** "

मामाला आमचं उत्तर पटायच्या आत आम्ही दोघी तिथून पळालो.

रात्री आज्जी आल्यावर मला म्हणायली, "**बाय, चूल तर पेटवलेली दिसत नाही मग एवढ्या काड्या कसल्या पेटवून टाकलेत.** "

काय बोलावं ते तर कळलंचं नाही,"**ते असंच सहज** "

टोलवाटोलवीची उत्तर देऊन आज्जीचं लक्ष फक्त विचलित केलं.

आमच्या आयुष्यातील हि पहिली आणि शेवटची सिगारेट जिचा अनुभव आम्ही 7 वीत घेतला. हि सिगारेट ची गोष्ट आमच्या दोघीत सीक्रेट राहिली अगदी आजपर्यंत. अजमात्र वाचल्यानंतर सगळयांना कळेल आम्ही काय कांड केला होता. साधी भोळी आणि निरागस असणाऱ्या बालपणात हा असा अनुभव आमच्या साठी थोडा विचित्र होता. आपले पाय कसे चुकीच्या मार्गावर डगमगतात पण आपल्याला काय चूक काय बरोबर हे वेळीच ओळखता आले पाहिजे आणि ह्या सगळ्या गीष्टींपासुन लांब राहिलं पाहिजे एवढं शहाणपण त्या दिवशी आलं.

त्यानंतर आम्ही खूपदा पणजी नसताना पणजोबा ला हि जादू करुन दाखवायला लावली आणि त्यांनी आम्हाला दाखवली आणि तशे भोळे भाळे माझे पणजोबा आम्हाला मोलाचं सांगिंतले

,"**विडी खूप वाईट, आम्हाला लागलेली घाण सवय पण तुम्ही लावायची नाहीत. माझी लाडकी मुलं** "

असं म्हणत ते आम्हाला लाड करायचे.

पणजोबा ची जादू आणि शिकलेला धडा मात्र कायम लक्षात राहिला.

8.मोगली एरंड

मोगली एरंड हे एक झाड आहे जे पाण्याच्या ठिकाणी येतात. याचा इतिहास असा आहे कि जुन्या काळी मुगल लोकं या एरंडाचा फळ मशाली पेटवण्यासाठी वापरत होती त्यावरून याचं नाव मोगली एरंड असं पडलं.

जास्त पाण्याच्या ठिकाणी हि झाडे मोठया प्रमाणात असतात.

आजोळ च्या ओढ्यांच्या कडेला हि झाडे होती. पहिल्या काळी एरंडीचे तेल वगैरे औषधासाठी वापरत असे पण आम्ही लहान असताना ते कधी कोणी वापरत नव्हते. अशी बरीच झाडं होती ज्याची तेव्हा आम्हाला नावं पण माहित नव्हती. आंबा, गजगे, कवीट, कडुनिंब, बाभूळ, पिंपळ, वड, चिंच, जांभूळ हि जास्त ओळखीची झाडे तर

निवडुंग, तरवड, केतक्या आणि एक काटेरी झाडं होतं ज्याला घट्ट मोठी टणक अशी फळ लागायची जी पूर्वी केस धुण्यासाठी आणि धुनी धुण्यासाठी वापरायची हि रोज बघण्यातली झाडे आम्ही लहान मुलं सहज ओळखायचो.

मोगली एरंड चं झाडं वस्तीवर तर नव्हतंच. ओढ्याकडे पण खूप आत गेल्यावर 2,4 झाडे होती ती पण आमच्या जास्त बघण्यात नव्हती.

आमची सुट्टी आणि रमजान महिना एकत्र आलं होतं. रमजान महिन्यात पूर्ण महिनाभर रोजे म्हणजे उपवास असतात. सकाळी सूर्योदयाच्या अगोदर म्हणजे साधारण 5 च्या आत खायचं आणि त्यानंतर दिवसभर ना पाणी ना अन्न डायरेक्ट मगरीब ला जेवण. मगरीब म्हणजे सूर्योदयानंतरचं.

माझा लहान भाऊ त्याने त्याचा पहिला रोजा ठेवला होता. तो साधारण 4 थी ला असावा. तो दिवसभर त्याच्या वयाच्या मुलांसोबत खेळायला जायचा. तेव्हा आज्जी आजोबांना दिवसभर शेतात जावं लागायचं . मामा वगैरे पुढच्या शिक्षणाला बाहेर गावी असायचे. त्यामुळे आत्ताच्या मुलांसारखं दिवसभर लक्ष ठेवायला कोण नसायचं. मुलं दिवसभर आपल्या वयाच्या मुलांसोबत खेळ खेळत बसायचे.

माझ्या भावाचा रोजा पूर्ण होईल असं काय आम्हाला वाटतं नव्हतं. रखरखत ऊन होतं त्यामुळे तहान लागली कि तो पाणी पिणार आणि रोजा मोडणार हीच भीती सगळ्यांना वाटतं होती.

माझा भाऊ आणि त्याच्यासोबत त्याच्या वयाची वस्तीवरच्या काही मुलं ,हि सगळी मुलं हुल्लडबाजी करत ओढ्याच्या मार्गाने गेली आणि संध्याकाळी मागारी घरी आली. भावाने रोजा मोडला नव्हता. साधारण मगरीब व्हायला अजून एखादा तास बाकी होता. आणि वस्तीवर एकच गोंधळ उडाला भावासोबत जी जी मुलं ओढ्याच्या दिशेने गेली होती ती भडाभड उलट्या करत होती. जवळपास 4,5 मुलं हि continue उलट्या करत होती आणि 15,20 मिनिटात ती मुलं पूर्ण पेकळून गेली. कोणाला काहीच समजत नव्हतं त्यांना गाडीत घालून पिलीव ला नेलं तिथल्या डॉक्टरांनी विषबाधा झालीय सांगितलं आणि लगेच अकलूज ला न्यायला सांगितलं.

आणि मग सगळ्यांनी विचारायला सुरुवात केली कि विषबाधा झालीं कशी. माझा भाऊ पण ह्याच मुलांसोबत होता पण तो ठणठणीत होता.

सगळ्यांचे घरचे हेच म्हणत होते कि मुलं म्हणत होती आम्ही काजू खाल्ले. कोठे खाल्ले काय खाल्ले काही माहित नाही. शेवटी वस्तीवरच्या सगळ्या मोठ्या माणसांनी माझ्या भावाला विचारलं कि ,''**तुम्ही दिवसभर कोठे गेलता आणि काय खाल्लं**''.

मग तो म्हणाला, "**आम्ही दिवसभर ओढ्यात फिरत होतो मग मुलांना भूक लागली तिथे काजूचि झाडे होती. कशाचं झाड आहे असं एकाने विचारल्यावर इम्रान म्हणाला- मेरी मम्मी शिरखुरमेमे दालती हे ये उसिका झाड हे. सगळी मुलं काजू सोलून खात होती मी पण त्यांच्यासोबत काजू तोंडात घातला मग माझ्या लक्षात आलं माझा रोजा आहे मग मी ते थुंक्कल. मुलं मला म्हणत होती कि काजू आहे खूप छान लागतायंत खा पण मी रोजा होता म्हणून नाही खाल्लं. बाकीच्या मुलांनी खूप खाल्लं आणि आम्ही ते खिशात पण भरून आणलं परत खायला**''

माझा भाऊ नुकताच रोजा सोडून आलेला आणि त्याच कपडयावरती होता. त्याला काजू खिशातून काढून दाखवायला सांगितले. त्यांने दाखवल्यावर सगळ्या मोठ्या माणसांनी डोक्यालाच हात लावला कारण ते काजू नाही तर **मोगली एरंड** च्या बिया होत्या. त्या सोलल्यानंतर जो आत मध्ये काजू सारखा बी होता तो ह्या मुलांनी काजू समजून खूप प्रमाणात खाल्ला होता. साध्या एरंडपेक्षा मोगली एरंड हे झाड खूप विषारी असतं आणि त्याचे परिणाम किती भयानक आहे याची प्रचिती त्या दिवशी आम्हाला आली.

मुलं 4 दिवस icu मध्ये होती. माझा भाऊ त्या दिवशी एवढ्या मोठ्या संकटातून वाचला ते फक्त त्याचा रोजा होता म्हणून." **देव तारी त्याला कोण मारी"**.

आपण कितीही पुढे गेलो science आणि बाकीच्या गोष्टीत ऍडव्हान्स झालो तरी, "**दवा के साथ दुआ का असर असतो**" हे मान्यच करावं लागेल.

माझ्या भावाने त्याच्या परतच्या आयुष्यात कधीही रमजान चे रोजे चूकवले नाही. अजून हि त्याची श्रद्धा भक्ती तशीच आहे.

4 दिवसानंतर रमजान ईद होती आणि हि सगळी मुलं पहिल्यांदा ईद ला घरी नव्हती hospital मध्ये होती. डॉक्टरांनी सांगितलं कि मुलांना तुम्ही लगेच hospital ला आणलं म्हणून वाचली नाहीतर ह्याना नाहीतर ह्यांना वाचवणं अवघड होतं.

ईद ला हि मुलं घरी नव्हती वस्तीवर सगळ्यांना चं ईद सेलेब्रेट करणं जड जात होतं. पण मुलं सुखरूप आहेत ह्या एका कारणाने सगळे देवाचे आभार मानत होते आणि प्रार्थना करत होते.

नंतर आम्ही आणि वस्तीवरच्या बऱ्याच मुलांनी हे **मोगली एरंड** चं झाड नक्की कसं असतं ते पाहिलं. कित्तेक दिवस वस्तीवर फक्त **मोगली एरंड** चीच चर्चा होती. सुट्टी संपेपर्यंत माझा भाऊ सेलेब्रेटी झालेला. प्रत्येक जण त्याला येऊन विचारात होता.," **कुठं झाड होत आणि मग कोणाच्या डोक्यात आलं कि ते खावं? मग ते खाताना कडू कसं काय नाही लागलं ? किती खाल्ली पोरांनी एरंड ? येडी का काय र पोरं तुम्ही ,काजू ची झाडी इथं**

असत्यात होय ?कशाला झक मारायला तिकडे गेलात. बरं कि तू खाल्लं नाही. " हजार प्रश्न आणि ढीगभर शिव्या.

ईद झाल्यावर मुलं घरी आली 2,4 मुलं वस्तीवरचीच होती आणि काही आजोळी आलेली होती. आल्यावर पण भेटायला जातो म्हणून जाणती माणसं बायका जाऊन पोरांना शिव्याच देऊन येतं होती

"**नक्की कुणी नेलं तुम्हाला ? नक्की कोणी खाऊ घातलं** ? **नक्की मोरक्या कोण होता** ?"

मुलं वाचली ती सुखरूप घरी आली त्यापेक्षा जास्त महत्वाचं अमक्याचा नातू लय अगाव लय ग्यान गेलेलं त्यानेच नेलं असेल. ज्याची त्याची आज्जी आजोबा आपल्या नातवाची side घेतं होता आणि आमच्या नाही तुमच्याच पोरानं खाऊ घातलं हे ठणकावून सांगत होते.

अजूनही हा मोगली एरंडीचा किस्सा आम्ही गेलो कि आज्जी आजोबा सांगतात लहान असताना कसं त्या पोरांनी मोगली एरंड खाल्लेलं आणि कसा माझा भाऊ वाचलेला.

मोगली एरंड झाड आणि बिया

9.माझा वाढदिवस

माझा वाढदिवस हा नेहमी उन्हाळी सुट्टीत result च्या दिवशी **1 मे**.

Result आणि वाढदिवस एकाच दिवशी. सहसा वाढदिवसा दिवशी मी आजोळलाच असायचे. माझ्या आजोळी साधं चप्पल तुटली तर ती नीट करायची पण सोय नव्हती त्यामुळे वाढदिवस म्हणजे नवे कपडे किव्वा केक असं काही नव्हतं पण तरीही छान वाढदिवस साजरा व्हायचा.

माझ्या मावस आज्जीच्या घरी लँडलाईन फोन होता. माझ्या आज्जीच्या घरामागेच त्यांचं घर, 11 च्या सुमारास पप्पा result सांगायला त्यांच्या लँडलाईन वर फोन करायचे. माझाच result महत्वाचा असायचा कारण मी थोडं अभ्यासात हुशार होते आणि कितवा नंबर आला हि उत्सुकता असायची. 6 विचा result होता आणि माझा पहिला नंबर आलेला.

वाढदिवस कसा साजरा होणार हा पहिला नंबर आला कि नाही यावरून ठरायचं.

आज्जी मात्र माझ्या प्रत्येक birthday ला गोड शिरा करायची मग नंबर येऊ ना येऊ. तिच्या हातचा शिरा खूप छान लागायचा मला खूप आवडायचा. सगळ्या वस्तीवर माझा नंबर आला हि चर्चा व्हायची आणि सोबत वाढदिवस आहे हि पण चर्चा. अगदी वस्तीवरच्या लहान लेकरापासून मोठ्या पर्यंत सगळे विश करायचे आणि कितवा नंबर आला हे आवर्जून विचारायचे. माझा वाढदिवस हा माझ्या साठी अगोदर पासूनच खूप आवडीचा दिवस होता आणि अजूनही आहे कारण हि तारीख प्रत्येकाच्या लक्षात राहायची आणि दुसरी गोष्ट या दिवशी result लागायचा आणि माझा पहिला किव्वा दुसरा नंबर असायचाच. त्यावेळी केक जास्त मिळायचे नाहीत. अगोदर ऑर्डर द्यावी लागायची ते पण मोठ्या सिटी तच त्यामुळे काहीतरी गोड बनवूनच वाढदिवस साजरा व्हायचा. पहिला नंबर आलेला असला कि पप्पा हमखास पिलीव वरून कोण येणार असेल तर त्यांच्या जवळ पेढे, कॅडबरी चॉकलेट पाठवून द्यायचे.

उद्या result म्हणलं कि मम्मी पप्पा आदल्या रात्री स्वतः खवा आटवून घरी पेढे करायचे. मी 4 थी त असताना 2 रा नंबर आलेला. 1ला नंबर आलेली मुलगी 5 वीला दुसऱ्या गावी शिकायला गेली मग पप्पाला वाटलं आता 5 वीत माझाच 1 ला नंबर येणार आणि त्या वर्षी माझा नंबर चं आला नाही. त्यांनी आटवून केलेले पेढे वाया गेले असं त्यांना वाटलं आणि ते खूप चिडले पण होते. 6 वि ला 1 ला नंबर तर आलेला पण पेढे घरचे नव्हते. बहुतेक 5 वी सारखं

आत्ता पण होईल म्हणून पप्पानी घरी पेढे केलंच नव्हते. मग संध्याकाळी मावस मावशीचा एखादा नवीन ड्रेस घालायचा. पेढे चॉकलेट सगळ्या वस्तीवर ओळखीच्या मित्र मैत्रिनींना वाटायचं त्यांच्या घरच्यांना पण द्यायचं. पणजी पंजोबाला द्यायचं. पणजोबा हळूच खिशातून 10 रुपयाची नोट काढून द्यायचे. आज्जीनी बनवलेला गोड शिरा खायचा.

हा असा बिना केक चा वाढदिवस साजरा व्हायचा.

आता वाढदिवसादिवशी 4, 4 केक कापले जातात. दिवसभर whatsapp messages, calls , स्टेटस ठेवलेले असतात, इन्स्टा स्टोरी असतात, नवीन कपडे ब्रँडेड गिफ्ट्स पण ती मज्जाच नाही

Result ची, माझ्या पप्पांच्या अपेक्षांची, पणजोबा च्या 10 rs च्या नोटेची, आज्जीच्या गोड शिऱ्याची

आणि चॉकलेट आणि पेढ्याची.

शेवटी एवढंच म्हणेन कि

“आठवणी त्याआजोळच्या काय सुरेख होत्या

घर बदलली

गाव बदलली

शाळेच्या भिंती बदलल्या

गावातील रस्ते बदलले

आता थकलेले ते माझेआजोबा

अजूनही बघतात वाट सुट्टीची

हिवाळी उन्हाळी सुट्टी

आणि नातवंड ....

अजूनही डोळे पाणवतात

त्यांचे आणि आमचेही

जेव्हा आठवण येते त्या बालपणाची

काय ते दिवस होते आणि काय त्याआठवणी

आजोळ आणि गोल्डन days"

मी ह्या माझ्या आठवणी शब्दात मांडताना नकळत पुन्हा एकदा सुट्टीत आजोळ जगून आले.

अजूनही माझी आज्जी आजोबा तिथेच आहेत वस्तीवर, फक्त घर बदललंय. पणजी पणजोबा नाहीत. पण त्यांचं घर अजूनही आहे.

विशेष म्हणजे मी अजूनही आजोळ ला जाते अजूनही आज्जीच्या हातची गरमा गरम चुलीवरची भाकरी खाते. अजूनही ओढे आहेत. कवटाची झाडे नाहीत पण बाकीचं अजूनही जसं च्या तसं आहे.

माझा मुलगा सिझान 7 वर्षाचा आहे आणि तोही सुट्टीत माझ्या आजोळी जातो म्हणजे त्याच्या पणजी पणजोबा कडे आणि मी नसतानाही तो सुट्टी त्याच्या पंजोळी मनसोक्त घालवतो .

आपण जिथे आपल्या सुट्ट्या घालवल्या आपली मुलं हि तिथेच सुट्ट्या घालवतायेत यापेक्षा भारी आनंद काय.....

तुम्ही हे पुस्तक वाचलं असेल आणि तुम्हाला खरंच मनापासून आवडलं असेल तर नक्की तुमचा feedback मेल, sms, whatsapp किव्वा कॉल करा.

तुमचं आजोळ आणि आजोळची एखादी गोष्ट माझ्यासोबत नक्की share करा आणि तुम्हाला माझं next बुक कुठल्या टॉपिक वर यावं असं वाटतं ते नक्की सांगा.

धन्यवाद...........

समाप्ती आणि आभार

हे पुस्तक माझ्या बालपणीच्या आजोळच्या आठवणींना अर्पण आहे. त्या निरागस क्षणांना, खेळांना, आणि गावच्या मातीला पुन्हा एकदा जिवंत करणं हाच उद्देश होता. वाचकांनी या कथांमध्ये त्यांचंही बालपण , आजोळ शोधावं, आठवावं, हीच अपेक्षा.

इ-साहित्य मुळे नवीन लेखकांना एक हक्काचं व्यासपीठ मिळालं जिथे नवीन लेखकांचं साहित्य वाचकापर्यंत पोहचू शकत आणि त्यांच्या प्रतिक्रियेच्या माध्यमातून त्यांना चालना मिळते . इ साहित्य टीम चे जेवढे आभार मानावे तेवढे कमी आहेत .

ह्या पुस्तकाच्या छायाचित्रांसाठी माझा भाऊ सैफ पठाण त्याची बायको तस्मिन आणि माझा लहान मुलगा सिझान याची खूप मदत झाली त्यामुळे त्यांचेही मनापासून धन्यवाद. पुस्तक लिहिताना प्रेरणा देणारे माझे पती शाहिदखान आणि भाऊ साहिल पठाण यांचे मनापासून आभार .

माझी आज्जी (राबिया पठाण) आजोबा(राजेखान पठाण) आई(साजिदा पठाण) वडील (शब्बेकदीर पठाण) यांनी दिलेले मार्गदर्शन आणि कळत नकळत मला लिखाणाला मदत करणाऱ्या प्रत्येकाचे मनापासूनआभार...

छायाचित्रे काढायला गेल्यावरची एक गोडं आठवण

(माझा मुलगा सिझान , मामाची छोटी मुलगी आयझा , भावाचा छोटा मुलगा जिहान आणि भावाची बायको तस्मिन हापश्यावर आनंद घेताना)

— Sanaha Pathan

लेखिकेची ई साहित्यवरील पूर्वप्रकाशित पुस्तके

ज्या कव्हरवर क्लिक कराल. ते पुस्तक उघडेल.